साऊथ इंडियन / पावभाजी / पंजाबी डिशेस / छोले भटूरे / पावभाजी / मिल्कशेक
नगरकर खवय्यांच्या पसंतीस उतरलेला साऊथ इंडियन
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो. 85306 40202
पार्सल सुविधा उपलब्ध..

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. २१.०५.२०२६ | अंक नं. ०४३ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्विमिंग व थंडीसाठी
स्विमिंग सुट, कॅप, गॉगल्स, लेगींग्ज टॉप, बरमुडा...
थर्मल, जर्किन स्वेटर, ग्लोज, सॉक्स, मफलर, कानटोपी...
ब्रॅण्डेड उत्तम क्वालिटीची कंम्प्लीट रेंज.
जरीवाला ▸ कापड बाजार, फोन नं. 7666510765 ▸ यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर. ▸ सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, पुणे. मो. 7775089505

- आज -
गुरूपुष्यामृतयोग
सोने खरेदीचा, सुवर्णयोग..
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹१११/-
21 मे 2026
CKJ मधील सोन्याचा आजचा भाव
22 कॅरेट सोन्याचा भाव (प्रती ग्रॅम) ₹14499/-*
चंदुकाका ज्वेलर्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
- बुधवार चालू -

# शेतात काम करत असलेल्या महिलेला भरदिवसा मारहाण करत दागिने लुटले

**नगर परिसरात महिनाभरातील तिसरी घटना, दोघा चोरट्यांवर गुन्हा दाखल**

नगर - शेतात काम करत असलेल्या महिलेला दोघा चोरट्यांनी मारहाण करत त्यांचे अंगावरील सोन्याचे दागिने बळजबरीने हिसकावून पळवून नेल्याची घटना नगर तालुक्यातील सोनेवाडी (चास) शिवारात २० मे रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास घडली आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे नगर परिसरातील अशा प्रकारची महिनाभरातील ही तिसरी घटना आहे.

याबाबत विजय आसाराम लोणकर (वय ४९, रा.सोनेवाडी, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. सोनेवाडी शिवारात फिर्यादी लोणकर यांचे शेत आहे. २० मे रोजी दुपारी १२ च्या सुमारास फिर्यादी यांची पत्नी मनिषा शेतात काम करत होती. त्यावेळी दुचाकीवरून दोन अनोळखी व्यक्ती त्या ठिकाणी आल्या. या दोघांनी अचानक मनिषा यांच्या वर हल्ला चढवला, तसेच त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसुत्र आणि कानातील सोन्याची कर्णफुले असा एकूण ७५ हजार रुपये किमतीचा ऐवज बळजबरीने ओरबाडून नेला. दागिने लुटल्यानंतर आरोपी दुचाकीवरुन पसार झाले. ही घटना मनिषा यांनी त्यांच्या पतीला कळविली. त्यानंतर विजय लोणकर यांनी पोलिसांना माहिती दिली.

या घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने, नगर तालुका पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक गणेश बारुळे, उपनिरीक्षक भरत धुमाळ यांनी पोलिस पथकासह घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

या प्रकरणी २ अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०९ (४) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक धुमाळ हे करत आहेत.

## शेतकरी वर्गामध्ये भीतीचे वातावरण

विशेष म्हणजे महिनाभरातील ही तिसरी घटना आहे. २० एप्रिल रोजी चिचोंडी पाटील शिवारातही अशीच घटना घडली होती. ताराबाई मुरलीधर कोकाटे (वय ६५, रा.चिचोंडी पाटील, ता.नगर) या व त्यांची सून शेतात काम करत असताना दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी चोरट्यांनी या दोघींना लाकडी काठीने मारहाण करत त्यांचे अंगावरील दागिने पळविले होते. शहरातील नालेगाव भागातील वारुळाचा मारुती परिसरात ३० एप्रिल रोजी सायंकाळी ६.१५ वाजण्याच्या सुमारास शेतात काम करणाऱ्या सौ.सुनंदा संतोष वामन (वय ३९, रा. वारुळाचा मारुती, नालेगाव) यांना ३ चोरट्यांनी अशाच प्रकारे मारहाण करत त्यांचे दागिने हिसकावून नेले होते.

नगर शहर परिसरात घडणाऱ्या चेन स्नॅचिंग सारख्या घटना आता ग्रामीण भागातही घडू लागल्या आहेत. भरदिवसा अशा लुटमारीच्या घटना होऊ लागल्याने शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे. असे गुन्हे करणाऱ्या टोळ्यांचा पोलिसांनी तातडीने बंदोबस्त करावा अशी मागणी होत आहे.

अधिक मासातील खास स्पेशल धोंडा थाळी
पूरण पोळी, आमटी, आमरस,पनीर भाजी, सूकी भाजी, आलू रजवडी, दालफ्राय अजुन बरेच काही..
स्पेशल आमरस 400/- किलो
पार्सल सुविधा उपलब्ध
महेंद्र पेडावाला रजवाडी गुजराती थाळी कापड बाजार, अहिल्यानगर.
रेल्वे पार्सल, किटी पार्टी व बर्थडे पार्टीसाठी खास सोय

जावई बापूंचे स्वागत करा गोडव्यानंवाण द्या परंपरेनं !
अधिक मास साठी स्पेशल...
अनारसे । म्हैसुरपाक । बत्ताशे
Since 1910 बम्बईवाला मिठाईयाँ एवम् फरसाण
स्वीट्स् । नमकीन । ड्रायफ्रुट । दिल्ली चाट । फास्टफुड
कापड बाजार, अ.नगर. चाणक्य चौक, बुरुडगाव रोड, अ.नगर. मो. : 9822041013 / 9623882710

फलेक्स प्रिंटींग संपर्क : 9403232323

# जगातील सर्वाधिक उष्ण १०० शहरांच्या यादीत सर्व शहरे भारतातील; महाराष्ट्रामधील चंद्रपूर आणि नागपूरचाही 'हॉट शहरांमध्ये' समावेश

नगर - जगभरातील सर्वाधिक उष्ण १०० शहरांच्या यादी जाहीर झाली असून, या यादीत सर्व १०० शहरे भारतातील असून, उष्णतेच्या बाबतीत भारत जागतिक विक्रमावर पोहोचला आहे. सर्वाधिक उष्ण देशाच्या यादीतही भारताने टॉप स्थान पटकावले आहे. महाराष्ट्रातील नागपूर आणि चंद्रपूरनेही जगभरातील उष्ण शहरांच्या यादीत स्थान मिळविले आहे. एकीकडे जगभरातील प्रमुख शहरे थंडा थंडा कूल कूल वातावरण अनुभवत असताना भारतातील थंड हवेसाठी प्रसिद्ध असलेले जम्मूला उष्णतेचा तडाखा बसला असून, तेथील तापमान ४५ अंशावर पोहोचले आहे.

हवा गुणवत्ता निर्देशांकाच्या २१ मे रोजीच्या जाहीर झालेल्या आकडेवारीनुसार देशातील १०० हून अधिक प्रमुख शहरांमध्ये तापमान ४७ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले असून हवामान खात्याने या भागांमध्ये अतिउष्णतेचा इशारा दिला आहे. प्रामुख्याने आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश, पंजाब, बिहार आणि मध्य प्रदेश या राज्यांना उष्णतेच्या लाटेचा प्रचंड तडाखा बसला आहे.

आंध्र प्रदेशातील राजमुंद्री हे शहर देशात सर्वाधिक उष्ण शहर नोंदवले गेले असून, येथील तापमान ४७ अंशावर पोहोचले आहे. त्यापाठोपाठ आंध्र प्रदेशातीलच मिमली, अमलापुरम, एलुरु, काकिनाडा, विझियानगरम आणि गुडिवडा या शहरांमध्येही तापमान ४६ ते ४७ अंश सेल्सिअस दरम्यान नोंदवले गेले आहे. छत्तीसगडमधील बिलासपूर आणि महासमुंद येथेही ४६ ते ४७ अंश तापमानामुळे नागरिक होरपळून निघाले आहेत.

उत्तर प्रदेशातील बहुतांश शहरांमध्ये सूर्य जणू आग ओकत आहे. जौनपूर, रामपूर, आझमगड, कानपूर आणि लखनऊ येथे तापमान ४५ अंशावर नोंदवले गेले आहे, तर औरैया, मैनपुरी, बलरामपूर, इटावा, एतवा, सीतापूर आणि अलिगढ या शहरांमध्ये तापमान ४४ अंशावर स्थिर आहे.

पंजाबमध्येही परिस्थिती बिकट असून गुरुदासपूर, कपूरथला आणि जालंधर येथे ४५ अंशावर, तर होशियारपूर, फतेहगढ साहिब आणि फरीदकोट येथे ४४ अंश तापमानाची नोंद झाली आहे. बिहारमधील बक्सर (४५ अंश), अर्राह (४४ अंश), बिहार शरीफ (४४ अंश) आणि पाटणा (४३ अंश) या भागातही असह्य उकाडा जाणवत आहे.

या तीव्र उष्णतेच्या लाटेचा फटका महाराष्ट्रातील विदर्भालाही बसला आहे. चंद्रपूर येथे ४४ अंश आणि नागपूर येथे ४३ अंश एवढ्या उच्चांकी तापमानाची नोंद झाली असून येथील नागरिकांना दुपारच्या वेळी घराबाहेर पडणे कठीण झाले आहे. पुढील काही दिवस उन्हाचा हा तडाखा असाच कायम राहण्याची शक्यता आहे. नागरिकांनी दुपारच्या वेळी विनाकारण घराबाहेर पडणे टाळावे, भरपूर पाणी प्यावे आणि आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## जम्मू-काश्मीर आणि उत्तराखंडलाही झळ

नेहमी थंड हवेची ठिकाणे म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशांनाही यंदा उन्हाचा चटका बसला आहे. जम्मू आणि काश्मीरमधील जम्मू परिसरात तापमान ४५ अंशावर पोहोचले आहे, तर उत्तराखंडमधील रुद्रपूर येथेही ४५ अंश तापमानाची नोंद झाली आहे. त्यामुळे थंड प्रदेशही आता उष्ण शहरांच्या यादीत जाऊन बसले आहेत.

WALK IN INTERVIEW
➡ Marketing Executive Post : 2
MBA / BBA / Graduate
➡ Data Entry Operator Post : 2
Graduate
➡ Purchase Executive Post : 2
Post Graduate / Graduate
➡ Computer Engineer Post : 2
BCA / MCA
➡ Account Assistant Post : 2
MBA / M.com / B. com
- Walk in Interview -
Date : 22 & 23 May 2026
Time: 10.00 am to 6.00 pm, Apply with full Bio-data
Success Electronics Pvt. Ltd.
Mobile : 9552521189
1267, Pratibha, Dalmandai, Ahmednagar.

# भेसळयुक्त कांदा बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान

**कंपनी संचालकासह कृषी सेवा केंद्र चालकावर फसवणुकीचा गुन्हा दाखल**

नगर - उन्हाळी कांदा लागवडीसाठी वापरण्यात आलेल्या बियाण्यांमध्ये खरिपी कांदा बियाण्यांची भेसळ करुन बनावट बियाणे विक्री केल्याचा प्रकार नगर तालुक्यात उघड झाला आहे. या बनावट बियाण्यांमुळे देहरे आणि शिंगवे नाईक येथील शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून, कृषी विभागाच्या पाहणी अहवालात शंभर टक्के नुकसान झाल्याचे मान्य करण्यात आले आहे. या प्रकरणी बियाणे कंपनीच्या संचालकासह कृषी सेवा केंद्र चालकावर एमआयडीसी पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत कृषी अधिकारी तथा बीज निरीक्षक बाळासाहेब रामचंद्र कांबळे यांनी २० मे रोजी फिर्याद दिली आहे. देहरे येथील आदर्श संतोष भगत यांनी पाच एकर, तर शिंगवे नाईक येथील बाळासाहेब विठ्ठल जाधव यांनी तीन एकर क्षेत्रावर उन्हाळी कांद्याची लागवड केली होती. यासाठी त्यांनी बुलडाणा जिल्ह्यातील पाडळी शिंदे (ता. देऊळगाव राजा) येथील 'यमुनाई फार्मर प्रोड्युसर कंपनी'च्या बियाण्यांची शिंगवे नाईक येथील श्री स्वामी समर्थ कृषी सेवा केंद्र येथून खरेदी केली होती.

लागवडीनंतर सुमारे दोन महिन्यांनी कांद्याला डेंगळे येणे, जोड कांदा तयार होणे, कांदा न पोसणे तसेच पातीची वाढ खुंटल्याचे शेतकऱ्यांच्या लक्षात आले. याबाबत संबंधित विक्रेत्याला माहिती देऊन शेतकऱ्यांनी ७ एप्रिल २०२६ रोजी कृषी विभागाकडे तक्रार दाखल केली.

यानंतर तालुका कृषी अधिकारी, महाबीजचे प्रतिनिधी आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी शेतात प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणीत सदोष बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे शंभर टक्के नुकसान झाल्याचा अहवाल देण्यात आला. मात्र, त्यानंतरही संबंधित कंपनी किंवा विक्रेत्यांवर कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नव्हती.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, कांदा पिकासाठी केलेला संपूर्ण खर्च वाया गेला असून लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. काही दिवसांपूर्वी कोपरगाव तालुक्यात अशाच प्रकारे बनावट कांदा बियाण्यांमुळे नुकसान झाल्यानंतर कृषी विभागाने संबंधित कंपनी आणि विक्री प्रतिनिधींवर गुन्हा दाखल केला होता. मात्र, नगर तालुक्यात शेतकऱ्यांचे शंभर टक्के नुकसान स्पष्ट झाल्यानंतरही कृषी विभाग दुर्लक्ष करत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला होता. त्यानंतर २० मे रोजी कृषी अधिकारी कांबळे यांच्या फिर्यादी नुसार पोलिसांनी यमुनाई फार्मर प्रोड्युसर कंपनीचा संचालक सुरज शिवानंद शिंदे व शिंगवे नाईक येथील श्री स्वामी समर्थ कृषी सेवा केंद्र चालक निखील गोविंद पाटील या दोघांच्या विरुद्ध फसवणुकीसह बीज अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला आहे.

# शरीरामध्ये बसविलेली ट्रॅकिंग चिप काढण्यासाठी 'आमरण उपोषण' सुरु


नंदकुमार खळेकर

नगर - माझ्या शरीरात बसवण्यात आलेली ट्रॅकिंग चिप तातडीने काढून टाकावी, अशी मागणी करीत अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर राहुरीतील एका व्यक्तीने आमरण उपोषण सुरु केले आहे. शरीरात ही चिप बसविल्यामुळे आपल्यावर सर्व नियंत्रण ठेवले जात असल्याचा आरोप संबंधिताने केला आहे.

राहुरी तालुक्यातील खडांबे बुद्रुक येथील रहिवासी नंदकुमार लक्ष्मण खळेकर यांनी याबाबत अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याशी याबाबत पत्रव्यवहार केला होता. खळेकर यांच्या शरीरात खासगी रुग्णालयातून ट्रॅकिंग चिप बसविलेली आहे. ही चिप काढून टाकण्यासाठी खळेकर गेल्या काही वर्षांपासून प्रयत्न करीत आहेत. या चिपमुळे संबंधीत जागेवर खाज येते, त्रास होतो. तसेच काहीजण माझ्यावर या चिपद्वारे थेट नियंत्रण ठेवत आहेत, असा आरोप खळेकर यांनी केला आहे.

खळेकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रात नमूद केले आहे, जिल्हा न्यायालयाने १० ऑक्टोबर २०२४ रोजीच्या आदेशानुसार शरीरातील चिप काढण्याचे निर्देश दिलेले आहेत. मात्र, जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडे वारंवार फॉलोअप घेवूनही ती काढली जात नाही. त्यामुळे न्यायालयाच्या आदेशानुसार ती चिप काढण्यात यावी, असे आदेश जिल्हा शल्य चिकित्सकांना देण्यात यावेत, अशी मागणी खळेकर यांनी पत्रात केली आहे.

आपल्या शरीरात असलेली चीप २० मे पूर्वी काढून टाकण्यात यावी, अन्यथा २१ मे पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशाराही खळेकर यांनी निवेदनाद्वारे दिला होता. त्यानुसार २१ मे रोजी खळेकर यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरु केले आहे. उपोषण सुरु झाल्यानंतर दुपारपर्यंत त्यांची प्रशासनाने दखल घेतलेली नव्हती. याबाबत त्यांनी सांगितले की, या उपोषण आंदोलनादरम्यान किंवा शरीरातील या चिपमुळे माझ्या प्रकृतीचे काही बरे-वाईट झाले, तर त्याची संपूर्ण जबाबदारी ही अहिल्यानगर जिल्हा प्रशासनाची राहील, असा इशारा त्यांनी दिला आहे.

यंदा जावयाला धोंडे वातानुकुलित हॉल मध्ये शाही थाटात !
खास अधिक मास निमित्त अन्नपुर्णा केटरर्स आयोजित
धोंडा व आमरस महोत्सव
दि. १७ मे ते १४ जून २०२६
५० ते १०० व्यक्तिंसाठी 810/- रु. प्रति व्यक्ति
१०१ ते २०० व्यक्तिंसाठी 720/- रु. प्रति व्यक्ति
रॉयल एसी. बँक्वेट हॉल शाही भोजन व्यवस्था
समाविष्ट सुविधा : * ५ हजार स्के.फू. डेकोरेटीव्ह एसी. हॉल * शाही भोजन बैठक व्यवस्था, ७५ व्यक्ति प्रति पंगत (फोटोप्रमाणे) * धोंडा, पुरणपोळी, १ स्वीट, आमटी व इतर मेनू आपल्या ऑर्डरनुसार * अतिरिक्त डेकोरेशन सेवा उपलब्ध (चार्जेबल)
स्थळ : रॉयल एसी. बँक्वेट हॉल, दुसरा मजला, बडीसाजन मंगल कार्यालय, आनंद हॉस्पिटल शेजारी
अन्नपुर्णा केटरर्स ऑफिस : पांजरपोळ गोरक्षण संस्था, अरणगाव रोड, अ.नगर
अधिक माहिती व बुकिंगसाठी संपर्क : संतोष गुगळे : मो. 98 23 22 23 40 दिपेश गुगळे : मो. 78 88 04 23 40

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# शहरात गोमांस विक्री करणाऱ्या चौघांवर गुन्हा दाखल

**पोलिसांची २ ठिकाणी छापेमारी, गोमांस सह हत्यारे केले जप्त**

नगर - नगर शहरातील कोठला परिसरात गोवंशीय जनावरांची कत्तल करून गोमांस विक्री होत असलेल्या २ ठिकाणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने २० मे रोजी छापेमारी करत गोमांस, लोखंडी सत्तूर, वजनकाटे, डीप फ्रीज असा १ लाख २४ हजारांचा मुद्देमाल जप्त करत चौघांवर गुन्हे दाखल केले आहेत.

कोठल्यातील घासगल्ली परिसरात एका बोळीत छापा टाकून ७० हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईत इस्माईल अजमुद्दीन शेख (वय ५५, रा. घासगल्ली, कोठला) व फैयाज कुरेशी (रा.सुभेदार गल्ली, झेंडीगेट) या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पो.हे.कॉ. योगेश भिंगारदिवे यांनी याबाबत तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

दुसरी कारवाई कोठला परिसरात रमजान अली टेलरच्या पाठीमागे बोळीत असलेल्या पत्र्याच्या खोलीत करण्यात आली. तेथे ५३ हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका १७ वर्षीय मुलासह सैफ शब्बीर कुरेशी (रा. झेंडीगेट) या दोघांवर तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पो.हे.कॉ. अरविंद भिंगारदिवे यांनी फिर्याद दिली आहे.

# बकरी ईद च्या दिवशी गोवंश किंवा गोहत्या केल्यास कठोर कारवाई

**पोलिस उपअधिक्षक डॉ.दिलीप टिपरसे यांचा शांतता समितीच्या बैठकीत इशारा**



बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर कोतवाली पोलिस स्टेशन येथे आयोजित शांतता समितीच्या बैठकीत बोलताना पोलिस उपअधिक्षक डॉ.दिलीप टिपरसे समवेत इतर अधिकारी व उपस्थित मुस्लिम समाजबांधव.

नगर - बकरी ईदच्या काळात शहरात कुठेही गोवंश किंवा गोहत्या तसेच प्राणी संरक्षण अधिनियमानुसार कत्तल करण्यास प्रतिबंध असलेल्या कोणत्याही प्राण्याची कत्तल केल्यास केल्यास संबंधितांवर कायद्यानुसार अत्यंत कडक कारवाई केली जाईल असा इशारा शहर विभागाचे पोलिस उपअधिक्षक डॉ.दिलीप टिपरसे यांनी दिला आहे.

मुस्लीम धर्मियांचा बकरी ईद हा सण २७ मे रोजी साजरा होत आहे. या पार्श्वभूमीवर २० मे रोजी सायंकाळी शहरातील कोतवाली पोलिस स्टेशनच्या आवारात शहर विभागाचे पोलिस उपअधिक्षक डॉ.दिलीप टिपरसे, कोतवालीचे पोलिस निरीक्षक संभाजी गायकवाड, तोफखान्याचे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ, भिंगार कॅम्पचे स.पो.नि. जगदीश मुलगीर यांचे उपस्थितीत मुस्लिम समाजातील मौलाना, खाटीक व बकरी व्यवसायीक, मुस्लीम समाजाचे प्रमुख पदाधिकारी आणि शांतता कमेटीचे सदस्य यांची बैठक घेण्यात आली.

सदर बैठकीत उपअधिक्षक डॉ.दिलीप टिपरसे यांनी मुस्लीम धर्मियांना बकरी ईद हा सण शांततेत साजरा करण्यात यावा, अनाधिकृतपणे गोवंश जातीचे जनावरांची कत्तल होणार नाही, उघडयावर कोणीही कत्तल करणार नाही, शासनाने ठरवुन दिलेल्या निर्देशांचे तंतोतंत पालन करावे या बाबत सुचना देण्यात आल्या तसेच सोशल मिडीयाव्दारे कोणीही आक्षेपार्ह पोस्ट अथवा व्हीडीओ प्रसारीत करणार नाही याबाबत सुचना दिल्या. तसेच कायदे व नियम डावलून कोणी बेकायदेशीर कृत्य केल्यास पोलिस प्रशासनाकडून कठोर कारवाई करण्यात येईल असा इशारा दिला.

यावेळी साहेबान जहागीरदार यांनी ही मुस्लिम समाजाला आवाहन करताना पोलिसांच्या सूचनांचे सर्वांनी तंतोतंत पालन करावे, प्रतिबंधित प्राण्यांची हत्या होणार नाही याची काळजी घ्यावी. पोलिसांना सहकार्य करावे असे आवाहन केले. तसेच महापालिकेने मुकुंदनगर परिसरात तात्पुरत्या कत्तलखान्याची व्यवस्था करावी, जेथे जेथे कुर्बानी दिली जाणार आहे तेथे घंटागाडीची व्यवस्था करावी, समाजानेही कुर्बानीनंतरचा कचरा घंटागाडीतच टाकावा. पोलिसांनी सर्व मशिदींच्या परिसरात बंदोबस्त तैनात करावा, कोणीही सोशल मिडीयावर अफवा पसरवू नये असे आवाहन केले.

# जिल्हा पोलीस दलातील ५ अधिकाऱ्यांची पदोन्नती

नगर - राज्य पोलीस दलातील पदोन्नतीची प्रतीक्षा अखेर संपुष्टात आली असून राज्यभरातील ७७ सहायक पोलीस निरीक्षकांना पोलीस निरीक्षक पदावर, तर ४८८ पोलीस उपनिरीक्षकांना सहायक पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. राज्याचे पोलीस महासंचालक सदानंत दाते यांनी यासंदर्भातील आदेश जारी केले आहेत. या निर्णयामुळे अनेक दिवसांपासून पदोन्नतीच्या प्रतीक्षेत असलेल्या अधिकाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या पदोन्नती प्रक्रियेत अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलातील एक सहायक पोलीस निरीक्षक व चार उपनिरीक्षकांचा समावेश असून त्यांची पदोन्नतीसह जिल्ह्याबाहेर बदली करण्यात आली आहे. पदोन्नती मिळालेल्या अधिकाऱ्यांमध्ये नितीन खंडागळे यांना सहायक पोलीस निरीक्षक पदावरून पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. त्यांची बदली छत्रपती संभाजीनगर शहर येथे करण्यात आली आहे. तसेच उपनिरीक्षकांमध्ये विनोद परदेशी, जयेश गांगुर्डे, अजिनाथ कोठाळे आणि समीर अभंग यांचा समावेश आहे. पदोन्नतीनंतर विनोद परदेशी यांची नवी मुंबई येथे नियुक्ती करण्यात आली आहे.

जयेश गांगुर्डे आणि अजिनाथ कोठाळे यांची नाशिक परिक्षेत्रात बदली करण्यात आली असून समीर अभंग यांची पुणे शहर पोलीस दलात नियुक्ती करण्यात आली आहे.

२५ मे २००४ नंतर शासन सेवेत रूजू झालेल्या सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षकांना त्यांच्या मूळ सेवाज्येष्ठतेनुसार ही पदोन्नती देण्यात आली आहे. पोलीस दलातील प्रशासकीय प्रक्रियेनुसार ही पदोन्नती करण्यात आल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, पदोन्नती मिळालेल्या अधिकाऱ्यांचे सहकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

## पाईपलाईन रोडवरून मोटारसायकलची चोरी

नगर - पाईपलाईन रोडवरील यशोदानगर येथील बाजारतळावर लावलेली हिरो कंपनीची एच एफ डिलक्स मोटारसायकल (क्र. एमएच १६ सीके ५४३५) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १४ मे रोजी सकाळी ८.३० ते रात्री ८ या कालावधीत घडली.

याबाबत आण्णा सुखदेव शिंदे (वय ४५, रा. निर्मलनगर) यांनी १८ मे रोजी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी अज्ञात चोरट्याच्या विरुद्ध बीएनएस कलम ३०५ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## माजी प्राचार्य एस. व्ही. कुलकर्णी यांचे निधन



नगर - शेवगाव येथील बाळासाहेब भारदे हायस्कूलचे माजी प्राचार्य एस.व्ही.कुलकर्णी यांचे २१ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शेवगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात १ मुलगा, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# कोरोना संपला, निर्बंध उठले; पण जिल्हा परिषदेचे गेट कुलूपबंदच

नगर - कोरोना महामारी संपून आणि त्या काळातील सर्व कडक निर्बंध उठून आता ५ वर्षे उलटून गेली आहेत. सर्व व्यवहार पूर्ववत झाले आहेत; परंतु अहिल्यानगर जिल्हा परिषदेने कोरोना काळात कुलूप लावून बंद केलेल्या गेटला कुलूप अजूनही तसेच आहे. कोरोना काळात सुरक्षेच्या कारणास्तव बंद करण्यात आलेले जिल्हा परिषदेचे गेट क्रमांक ३ आजही कुलूपबंद असल्याने दररोज कार्यालयात येणाऱ्या हजारो नागरिकांना आणि वाहनधारकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. जिल्हा परिषद प्रशासनाच्या या अक्षम्य दुर्लक्षामुळे परिसरात दररोज वाहतूक कोंडी होत असून, नागरिकांचा वेळ आणि इंधन वाया जात आहे.



कोरोना संपल्यानंतर कुलूपबंदच असलेले जिल्हा परिषदेचे गेट.

जिल्हा परिषदेच्या मुख्य गेट क्रमांक १ वर प्रशासनाने एक स्पष्ट सूचना फलक लावला आहे. त्यानुसार, दोनचाकी व इतर सर्व प्रकारच्या वाहनांनी गेट क्रमांक ३ मधून प्रवेश करावा, असे आदेश देण्यात आले आहेत. मात्र प्रत्यक्षात गेट क्रमांक ३ वर्षानुवर्षे बंद असल्याने सर्व वाहनधारकांना सक्तीने एकाच गेटचा वापर करावा लागतो. यामुळे आत येणाऱ्या आणि बाहेर जाणाऱ्या वाहनांची मोठी कोंडी होते. नागरिकांना रोज ६०० ते ७०० फूट अतिरिक्त अंतर पार करावे लागत असून, इंधनाचाही मोठा अपव्यय होत आहे.

या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते शेख शहाजान फकीर यांनी ३० एप्रिल रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना ई-मेलद्वारे लेखी तक्रार केली होती. मात्र, तब्बल दहा दिवसांनंतर प्रत्यक्ष कार्यालयात जाऊन चौकशी केली असता, संबंधित अधिकाऱ्यांनी नेहमीप्रमाणे तो ई-मेल पाहिलाच नसल्याचे समोर आले.

याबाबत शेख शहाजान फकीर यांनी प्रत्यक्ष जाऊन बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंत्यांची भेट घेतली. विशेष म्हणजे, जिल्हा परिषदेचे गेट क्रमांक ३ बंद आहे, याची साधी कल्पनाही मुख्य अभियंत्यांना नव्हती! प्रशासनातील हा समन्वयाचा अभाव पाहून आश्चर्य व्यक्त होत आहे. फकीर यांनी ही बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर मुख्य अभियंत्यांनी तत्काळ चौकशी करून हे गेट सुरू करण्याचे आश्वासन दिले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात इंधन बचतीचे आवाहन केले आहे. या आवाहनाला प्रतिसाद म्हणून तरी प्रशासनाने तातडीने गेट क्रमांक ३ उघडावे किंवा गेट नंबर १ वर असलेला चुकीची माहिती देणारा दिशाभूल करणारा फलक तरी काढून टाकावा, अशी मागणी शेख शहाजान फकीर यांनी केली आहे.

## मनोज चावला यांचे हृदयविकाराने निधन



नगर - येथील रहिवासी मनोज कर्तारसिंग चावला (वय ६०) यांचे २० मे रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे २१ मे रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुन, नातवंडे असा परिवार आहे. ॲड. हर्षद चावला यांचे ते वडील होत.



माळीवाड्यातून टेम्पो चोरणाऱ्या आरोपीला काही तासांत पकडल्यानंतर त्याच्या समवेत कोतवाली पोलिसांचे पथक.

# माळीवाड्यातून टेम्पो चोरणाऱ्या आरोपीला काही तासांत पकडले

नगर - माळीवाडा परिसरातून २० मे रोजी दुपारी चोरीला गेलेल्या टाटा कंपनीच्या एन्ट्रा मालवाहू टेम्पोचा कोतवाली पोलिसांनी काही तासांत शोध घेत आरोपीला पकडले आहे. जहिर सादिक शेख (वय २९, रा नारायणडोह, ता.नगर) असे या आरोपीचे नाव आहे.

फिर्यादी प्रवीण गोपीनाथ गुंड (रा. पारगाव भातोडी, ता.नगर) यांचा मालवाहू टेम्पो (क्र. एमएच १६ सीडी १६७५) हा २० मे रोजी दुपारी १२.३० ते १२.४० या कालावधीत माळीवाडा परिसरातील एका दुकानासमोरून चोरीला गेला होता. याबाबत त्यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला. कोतवाली पोलिसांचे गुन्हे शोध पथक या टेम्पोचा शोध घेत असताना पो.नि. संभाजी गायकवाड यांना गोपनीय माहिती मिळाली की, सदर चोरलेला टेम्पो घेवून आरोपी पुणे बस स्थानकासमोर येणार आहे. ही माहिती मिळताच त्यांनी गुन्हे शोध पथकाचे पोलिस उपनिरीक्षक प्रवीण पाटील व पथकाला कारवाई साठी पाठविले. या पथकाने तात्काळ बसस्थानकाबाहेर जावून सापळा लावला. थोड्याच वेळात संशयित टेम्पो रस्त्याने जाताना दिसला. पथकाने पाठलाग करत तो पकडला. व आरोपी जहिर सादिक शेख यास ताब्यात घेवून कोतवाली पोलीस स्टेशन येथे आणले.

सदरची कारवाई पो.नि. संभाजी गायकवाड यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक प्रवीण पाटील, पोलिस अंमलदार बाळकृष्ण दौंड, विनोद बोरगे, राहुल शिंदे, साबीर शेख, विशाल दळवी, विजय ठोंबरे, दत्तात्रय कोतकर, सचिन लोळगे, शिरीष तरटे, अतुल काजळे, अमोल गाडे, दिपक रोहकले, सुरज कदम, सत्यम शिंदे, रमेश शिंदे, अतुल लाटे, याकुब शेख, राहुल गुंडू, महिला पो. कॉ.पल्लवी रोहकले यांचे पथकाने केली आहे.

# भर उन्हात शिक्षकांची जनगणनेसाठी पायपीट, नेप्ती परिसरात नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग



नगर तालुक्यातील नेप्ती परिसरात भारतीय जनगणना २०२७ नुसार १६ मे ते १४ जून अखेर महाराष्ट्रात घरयादी व घरगणना करण्याचे आदेशित करण्यात आले असून त्यानुसार प्रत्यक्ष जनगणना मोहिमेला सुरुवात झाली आहे.

नगर - नगर तालुक्यातील नेप्ती व परिसरातील निमगाव वाघा, हिंगणगाव, हमीदपूर,जखणगाव आदी भागात भारतीय जनगणना २०२७ नुसार १६ मे ते १४ जून अखेर महाराष्ट्रात घरयादी व घरगणना करण्याचे आदेशित करण्यात आले असून त्यानुसार प्रत्यक्ष जनगणना मोहिमेला सुरुवात झाली आहे. नेप्ती व परिसरातही जनगणना कार्य सुरू असून ग्रामस्थांकडून या मोहिमेला प्रतिसाद मिळत आहे.

भर उन्हात शिक्षकांनी घरोघरी जाऊन नागरिकांची माहिती संकलित करण्याचे काम सुरू ठेवले आहे. गावातील नागरिक शिक्षकांना सहकार्य करत असून अनेक ठिकाणी चहा, पाणी व अल्पोपहाराची व्यवस्था करून त्यांचे स्वागत करत आहेत अशी माहिती रामदास फुले यांनी दिली.

नेप्ती येथील प्रगणक यादी गट क्र. २६१ मध्ये जनगणना प्रगणक शिक्षक बाळासाहेब भाऊसाहेब कड व संभाजी कांडेकर यांनी प्रत्येक घरोघरी जाऊन जनगणनेतील ३४ प्रश्नावलीच्या आधारे माहिती संकलित केली. यावेळी रामदास फुले, शंकर फुले, जानकाबाई फुले उपस्थित होते.

कुटुंबातील सदस्य संख्या, शैक्षणिक स्थिती, रोजगार, निवास व्यवस्था तसेच विविध सामाजिक बाबींची माहिती काळजीपूर्वक नोंदवण्यात आली. कडक उन्हामुळे शिक्षकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असला तरी ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे जनगणनेचे काम अधिक वेगाने आणि प्रभावीपणे सुरू असल्याचे चित्र दिसून आले.

यावेळी शिक्षक संभाजी कांडेकर यांनी नागरिकांशी संवाद साधताना सांगितले की, जनगणना ही केवळ आकडेवारी गोळा करण्याची प्रक्रिया नसून देशाच्या विकासाचा पाया आहे. शासनाच्या विविध योजना, सुविधा आणि निधी वाटपासाठी अचूक माहिती आवश्यक असते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने खरी व अचूक माहिती देऊन प्रशासनाला सहकार्य करणे गरजेचे आहे. त्यांनी पुढे सांगितले की, भर उन्हात काम करत असताना ग्रामस्थांकडून मिळणारे प्रेम, आपुलकी आणि सहकार्य आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. त्यामुळे शिक्षक अधिक उत्साहाने जनगणनेचे कार्य पार पाडत आहेत. जनगणना ही केवळ सरकारी मोहीम नसून देशाच्या विकासाचा पाया आहे असे प्रतिपादन जनगणना प्रगणक शिक्षक संभाजी कांडेकर यांनी केले.

## रंगनाथ कलगुंडे यांचे अल्प आजाराने निधन




नगर - निमगाव खलु येथील रहिवासी रंगनाथ अर्जुन कलगुंडे (वय ७५) यांचे २१ मे रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर निमगाव खलू येथे भिमानदीतिरी अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुना, नातवडे, जावई असा परिवार आहे.

निमगाव खलुचे माजी सरपंच संदीप कलगुंडे, विकास कलगुंडे, प्रमिला बरकडे यांचे ते वडील होत.

## विठ्ठल दंडवते यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - गोगादेव मंदिरा शेजारील देशमुखवाडी येथील रहिवासी देवदैठण येथील संतश्रेष्ठ श्री संत निंबराज महाराज यांचे वंशज, मोजणी लॅण्ड रेकॉर्डचे निवृत्त अधिकारी, कलाविश्व प्रतिष्ठान संस्थेचे खजिनदार विठ्ठल नरहर दंडवते (वय ९५) यांचे १९ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. भाजपा सांस्कृतिक आघाडीचे प्रमुख, आर्टिस्ट हेमंत व महेश दंडवते यांचे ते वडील होत.

## वसंतराव शेलार यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - सुंदरनगर, कडा येथील रहिवासी वसंतराव दशरथ शेलार (नाना, वय ७७) यांचे २० मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २१ मे रोजी कडा येथील स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, ३ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. भिकाजी शेलार यांचे ते वडील होत.



## माऊंट सिनाय कॉन्व्हेंट स्कूलचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

सारोळा बद्दी येथील माऊंट सिनाय कॉन्व्हेंट स्कूलच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळातर्फे इयत्ता ५ वी व ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी फेब्रुवारी महिन्यात घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश प्राप्त केले. इयत्ता ५ वी च्या परिक्षेत रूद्र गुंड व दर्शन शिंदे तर इयत्ता ८ वी मध्ये अक्षदा उबाळे, ऋतुजा म्हस्के व स्वराज शिंदे यांनी यश प्राप्त केले. यशस्वी विद्यार्थ्यांचा विद्यालयाच्या मुख्याध्यापिका जयश्री खरात यांच्या हस्ते पुष्प गुच्छ व रोख रक्कम देवून सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना नेहा केदारे, उज्वला पंडित, अश्विनी कोरडे, कविता आढाव यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यालयाचे संस्थापक डॉ. शाम खरात, विश्वस्त ज्योत्स्ना शिंदे, ज्योती हासे व राजेश चक्रे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# घरगणना, एसआयआरमधून भटके विमुक्त वंचित राहू नये

**अनुलोम संस्थेचे प्रशासनाला निवेदन; प्रगणक आणि बीएलओंनी पालांपर्यंत पोहोचावे**



तहसीलदार संजय शिंदे यांना निवेदन देताना अनुलोम संस्थेचे कार्यकर्ते.

नगर - महाराष्ट्रात सध्या सुरू असलेल्या घरगणना आणि एसआयआर प्रक्रियेत भटके विमुक्त समाजातील एकही कुटुंब वंचित राहू नये, यासाठी अनुलोम संस्थेने प्रशासनाकडे विशेष मागणी केली आहे. मुद्दा आधारित फेलोशिपअंतर्गत भटके विमुक्त समाजाच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या संस्थेने स्थानिक प्रशासनाला निवेदन देत प्रगणक आणि बीएलओ यांना विशेष सूचना देण्याची विनंती केली आहे.

संस्थेच्या म्हणण्यानुसार, भटके विमुक्त समाज आजही अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगत आहे. अनेक कुटुंबे गावाबाहेर पालात, झोपडीत किंवा उघड्यावर वास्तव्यास असून रोजगारासाठी सतत स्थलांतर करत असतात. त्यामुळे त्यांच्या नावांची नोंद जनगणना आणि एसआयआर प्रक्रियेतून सुटण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. जनगणनेच्या नियमावलीनुसार ज्या ठिकाणी व्यक्ती प्रत्यक्ष वास्तव्यास आहे, त्याच ठिकाणी त्याची नोंद करणे बंधनकारक आहे. अनेक कुटुंबांकडे ओळखपत्र, रेशन कार्ड किंवा निवासाचा पुरावा नसतानाही त्यांची नोंद करणे आवश्यक असल्याचे संस्थेने स्पष्ट केले. याबाबत तहसीलदार संजय शिंदे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी अनुलोम कार्यकर्ते संग्राम गायकवाड, रवींद्र खजिनदार, अनुलोम भाग जनसेवक राम भालसिंग उपस्थित होते.

संस्थेने प्रशासनाकडे खालील प्रमुख मागण्या केल्या आहेत सर्व प्रगणक आणि बीएलओ यांना भटके विमुक्त वस्त्या, पाल व स्थलांतरित कुटुंबांपर्यंत जाऊन शंभर टक्के नोंदणी करण्याच्या सक्त सूचना द्याव्यात. कागदपत्रांच्या अभावामुळे कोणतेही कुटुंब वंचित राहू नये; प्रत्यक्ष वास्तव्यानुसार नोंद करण्यात यावी. गावाबाहेरील वस्तींपर्यंत पोहोचण्यासाठी प्रशासनाने स्थानिक सामाजिक कार्यकर्ते आणि सोबती गटांचे सहकार्य घ्यावे. जर भटके विमुक्त समाजाची नोंदच झाली नाही तर भविष्यातील शासकीय योजना, हक्क आणि संविधानिक लाभांपासून हा समाज पुन्हा एकदा वंचित राहण्याचा धोका निर्माण होईल. यावेळी अहिल्यानगरचे तहसीलदार संजय शिंदे यांनी स्वजनगणनेची व्हिडिओद्वारे माहिती दाखवली आणि तुम्ही स्वजनगणना करून आम्हाला फक्त येणारा कोड दाखवा म्हणजे जनगणना करताना चूक होणार नाही असे मत व्यक्त केले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### यांनी दुग्धजन्य पदार्थ खावे का?

मधुमेह असणाऱ्यांनी दूध आणि दही खाल्लं तरी चालतं, फक्त जरा सांभाळून घ्यावं लागतं. दुधात प्रोटीन आणि कॅल्शियम चांगलं असतं आणि त्याचा ग्लायसेमिक इंडेक्स पण कमी आहे, त्यामुळे साखर लगेच वाढत नाही. पण फुल क्रीम दूधाऐवजी स्किम्ड किंवा टोन्ड दूध घ्या कारण त्यात फॅट कमी असतो. दिवसाला एक कप पुरेसं आहे आणि साखर न घालता घेतलं तर उत्तम. दही तर अजून चांगलं कारण त्याचा ग्लायसेमिक इंडेक्स दुधापेक्षाही कमी आहे आणि त्यात पचनाला मदत करणारे प्रोबायोटिक्स असतात. फक्त घरी लावलेलं, बिनासाखरेचं दही किंवा ताक घ्या. गोड दही, श्रीखंड, फ्रूट यॉगर्ट हे सगळे टाळा कारण त्यात साखर खूप असते. बासुंदी, रबडी, मिल्कशेक, आईस्क्रीम यांच्यापासून पण लांब रहा. प्रत्येकाची शुगर आणि औषधं वेगळी असतात, त्यामुळे एकदा दूध-दही खाऊन २ तासांनी शुगर तपासून बघा की तुमच्यावर काय परिणाम होतोय. तुमच्या आहारात काही मोठा बदल करण्यापूर्वी तुमच्या डॉक्टरांचा किंवा डायबेटोलॉजिस्टचा सल्ला नक्की घ्या.

## पाककला

### शेजवान फ्राईड राईस

**साहित्य :** २ वाट्या गार मोकळा भात, १ वाटी बारीक चिरलेल्या मिक्स भाज्या गाजर, फरसबी, कोबी, सिमला मिरची, १ उभा चिरलेला कांदा, ७-८ चिरलेल्या लसूण पाकळ्या, २ उभ्या चिरलेल्या हिरव्या मिरच्या, २-३ चमचे शेजवान सॉस, १ चमचा सोया सॉस, १ चमचा व्हिनेगर, मीठ मिरपूड चवीनुसार, २-३ चमचे तेल, कांद्याची पात गार्निशसाठी.

**कृती :** कढईत तेल गरम करून लसूण हिरवी मिरची १० सेकंद परता. कांदा टाकून मोठ्या आचेवर १ मिनिट परता. मग सगळ्या भाज्या टाकून २ मिनिटं कुरकुरीत परता. शेजवान सॉस, सोया सॉस, व्हिनेगर, मिरपूड टाका आणि मीठ जपून टाका. लगेच गार भात टाकून मोठ्या आचेवर २ मिनिटं झटपट मिक्स करून टॉस करा. वरून कांद्याची पात टाकून गरम सर्व्ह करा. आच पूर्ण वेळ मोठी ठेवा आणि भात आदल्या दिवशीचा वापरा म्हणजे हॉटेलसारखा मोकळा होतो.

## वास्तू

### ऑफीससाठी...

* बॉस किंवा मॅनेजरने नैऋत्य कोपऱ्यात दक्षिण किंवा पश्चिमेकडे तोंड करून बसावं. यामुळे स्थिरता आणि अधिकार वाढतो. कर्मचारी उत्तर किंवा पूर्वेकडे तोंड करून बसले तर कामात लक्ष लागतं, प्रगती होते. दक्षिणेकडे तोंड करून कधीच बसू नका.

* टेबल चौकोनी किंवा आयताकृती असावं. तुटलेलं, गोल किंवा ड-शेप टेबल टाळा. खुर्चीला उंच पाठीचा आधार असावा. पाठीमागे भिंत असावी, खिडकी किंवा दार नको. पाठीमागून एनर्जी निघून जाते असं मानतात. टेबलवर कागदपत्रांचा गोंधळ नको, स्वच्छ ठेवा.

* ऑफिसचा मुख्य दरवाजा उत्तर, पूर्व किंवा ईशान्य दिशेला असावा. दरवाजा आत उघडणारा असावा. रिसेप्शन ईशान्य किंवा पूर्व दिशेला ठेवा. रिसेप्शनवर नेहमी हसरा चेहरा असणारी व्यक्ती बसवा.

## सौंदर्य

* दाढी रोज ट्रिम करा किंवा क्लीन शेव्ह करा. दाढी ठेवत असाल तर बियर्ड ऑइल लावा मऊ राहते.

* आठवड्यातून २-३ वेळा केस धुवा. शाम्पू नंतर कंडिशनर लावा.

* केसांमध्ये तेल आठवड्यातून एकदा लावा. दर महिन्याला हेअरकट करा.

* भुवया खूप वाढल्या असतील तर ट्रिम करा. नाकातले, कानातले केस कापा.

* आठवड्यातून एकदा पाय स्वच्छ करा, क्रॅक क्रीम लावा.

## सल्ला

* तांदूळ, डाळीच्या डब्यात कडुलिंबाची पानं किंवा लवंग टाका, किड लागत नाही.

* हिरवी मिरची देठ काढून हवाबंद डब्यात ठेवा.

* लिंबू मिठाच्या डब्यात ठेवा, महिनाभर ताजे राहतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. २२ मे २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, अधिक ज्येष्ठ शुक्लपक्ष, आश्लेषा २६।०८, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. २७ मि.**

### राशिभविष्य

मेष : कामात यश मिळेल, पण रागावर नियंत्रण ठेवा. आर्थिक लाभाचे योग आहेत.

वृषभ : घरात आनंदी वातावरण राहील. खर्च वाढेल, तब्येत जपा.

मिथुन : नोकरीत प्रगती, वरिष्ठांकडून कौतुक मिळेल. गुंतवणुकीसाठी चांगला दिवस.

कर्क : मानसिक तणाव राहील, महत्त्वाचे निर्णय टाळा. कुटुंबाची साथ मिळेल.

सिंह : आत्मविश्वास वाढेल, समाजात मान मिळेल. प्रेमसंबंधात गोडवा राहील.

कन्या : दिवस धावपळीचा, कामाचा ताण जाणवेल. भावंडांशी वाद टाळा.

तूळ : भाग्याची साथ, अचानक धनलाभ होईल. मित्रांच्या भेटीगाठी होतील.

वृश्चिक : गैरसमज होऊ शकतात, बोलण्यावर संयम ठेवा. जुने पैसे वसूल होतील.

धनु : व्यवसायात नवीन करार, नोकरीत प्रमोशनचे योग. प्रवास लाभदायक राहील.

मकर : खर्चावर नियंत्रण ठेवा, चिंता करू नका. कर्जाचे प्रकरण मिटेल.

कुंभ : मित्रांची मदत, अडलेले पैसे मिळतील. नवीन नोकरीची संधी येईल.

मीन : मनातील इच्छा पूर्ण होईल, कुटुंबासोबत वेळ मजेत जाईल. वाणी जपा.

## फिल्मीचक्कर क्र. १२३७ सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | | ३ | ■ | ४ |
| | ■ | | ■ | ■ | ५ | ६ | |
| ७ | ८ | | ■ | ९ | | | ■ |
| ■ | | ■ | १० | ■ | ■ | ११ | १२ |
| १३ | | १४ | ■ | १५ | १६ | | |
| | ■ | १७ | | ■ | १८ | | ■ |
| ■ | १९ | ■ | ■ | २० | ■ | २१ | |
| २२ | | | | | | | ■ |

**आडवे शब्द :-** १) 'धूमधडाका, गंमत जंमत, आयत्या घरात घरोबा, 'अशी ही बनवाबनवी' आदी मराठी चित्रपटांतील प्रसिद्ध विनोदी अभिनेता ५) रेखा, धर्मेंद्र यांचा एक चित्रपट ७) जुन्या काळातील एक चरित्र अभिनेत्री -+++ कौशल ९) नमक +++ (चित्रपटाचे नाव) १०) मेरे दिल + आज ये क्या है (गाणे) ११) ++ देशपांडे (अभिनेत्री) १३) +++ समझा करो (चित्रपटाचे नाव) १५) जुन्या काळातील एक दिवंगत अभिनेत्री १७) + + फरिश्ता (चित्रपटाचे नाव) १८) ++ का फूल (चित्रपटाचे नाव) २१) ++ वादे (चित्रपटाचे नाव) २२) दूरचित्रवाणीवरील एक अभिनेत्री (चित्रपटांतही आली)

**उभे शब्द :-** १) यात शाहरूखखान नायक आहे २) +++ किस्मत की (चित्रपटाचे नाव) ३) यात शशी कपूर, शबाना आझमी, डॅनी आहेत ४) ++ ज्ञानेश्वर (चित्रपटाचे नाव) ६) अंगप्रदर्शनासाठी प्रसिद्ध असलेली एक अभिनेत्री जी आता काम करीत नाही ८) सुनील दत्त, नूतन यांचा एक चित्रपट १२) ++ बलराम (चित्रपटाचे नाव) १३) ++ उठा इन्सान (चित्रपटाचे नाव) १४) मेरे ++ की गंगा और तेरे (गाणे) १६) 'रोजा' चित्रपटाची नायिका १९) राजा और ++ (चित्रपटाचे नाव) २०) ++ दे के देखो (चित्रपटाचे नाव)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** जगायचं असेल तर सूर्याप्रमाणे जगा, स्वतः जळून दुसऱ्याला प्रकाश द्या.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मासे पाण्यात श्वास कसे घेतात?

माशांना श्वास घेण्यासाठी 'कल्ले' असतात. माशाच्या डोक्याच्या दोन्ही बाजूला, डोळ्यांच्या अगदी मागे कल्ले असतात. त्यावर एक टणक झाकण असतं, त्याला 'कल्लाझाकण' किंवा 'ऑपरक्युलम' म्हणतात. हे झाकण उघडून बघितलं तर आत लालभडक रंगाचे, फणीसारखे कल्ले दिसतात.

कल्ले खूप नाजूक असतात. प्रत्येक बाजूला ४-४ कल्ल्यांच्या कमानी असतात. त्या कमानींना 'गिल आर्च' म्हणतात. प्रत्येक कमानीवर शेकडो बारीक तंतू असतात, त्यांना 'गिल फिलामेंट' म्हणतात. आणि प्रत्येक तंतूवर आणखी अतिसूक्ष्म प्लेट्स असतात, त्यांना 'लॅमेली' म्हणतात. या लॅमेलीमध्ये रक्तवाहिन्यांचं जाळं पसरलेलं असतं. इतक्या बारीक रचनेमुळे पाण्याला स्पर्श करायला खूप जास्त जागा मिळते.

सगळ्यात आधी मासा तोंड उघडतो. तोंड उघडल्यावर आतली पोकळी मोठी होते. त्यामुळे बाहेरचं पाणी झटकन तोंडात शिरतं. या वेळी कल्ल्याचं झाकण मात्र घट्ट बंद असतं, जेणेकरून पाणी मागून येऊ नये.

या दाबामुळे पाणी मागच्या बाजूला ढकललं जातं. त्याच वेळी कल्ल्याचं झाकण थोडंसं उघडतं. आता ते पाणी कल्ल्यांच्या त्या बारीक फिलामेंट्स आणि लॅमेलीवरून वाहत जातं.

मासे पाण्यात श्वास घेण्यासाठी कल्ले वापरतात. माशाच्या डोक्याच्या दोन्ही बाजूला डोळ्यांच्या मागे कल्ले असतात आणि त्यावर ऑपरक्युलम नावाचे झाकण असते. कल्ल्यांची रचना खूप गुंतागुंतीची असते. प्रत्येक कल्ल्यामध्ये कमानीसारखे गिल आर्च असतात आणि त्या कमानींवर शेकडो बारीक गिल फिलामेंट्स असतात. या प्रत्येक फिलामेंटवर आणखी अतिसूक्ष्म लॅमेली असतात आणि त्या लॅमेलीमध्ये रक्तवाहिन्यांचे जाळे पसरलेले असते. ही रचना इतकी बारीक असते की पाण्याशी संपर्क साधण्यासाठी खूप मोठा पृष्ठभाग उपलब्ध होतो. मासा जेव्हा श्वास घेतो तेव्हा सगळ्यात आधी तो तोंड उघडतो. तोंड उघडल्यामुळे आतली पोकळी मोठी होते आणि दाब कमी झाल्याने आजूबाजूचे पाणी झटकन तोंडात शिरते.

या वेळी कल्ल्यांचे झाकण बंद असते. त्यानंतर मासा तोंड बंद करतो आणि तोंडातल्या स्नायूंनी पाण्यावर दाब देतो. या दाबामुळे पाणी मागच्या बाजूला कल्ल्यांवरून ढकलले जाते आणि त्याच वेळी कल्ल्याचे झाकण उघडते. पाणी त्या बारीक लॅमेलीवरून वाहत असताना पाण्यात विरघळलेला ऑक्सिजन लॅमेलीमधल्या रक्तवाहिन्यांमध्ये शोषला जातो, कारण रक्तात ऑक्सिजनचे प्रमाण कमी असते. त्याच वेळी रक्तात साठलेला कार्बन डायऑक्साइड पाण्यात सोडला जातो. या क्रियेला विसरण म्हणतात. ऑक्सिजन काढून घेतलेले आणि कार्बन डायऑक्साइड मिसळलेले पाणी नंतर कल्लाझाकणातून बाहेर टाकले जाते आणि ही प्रक्रिया सतत चालू राहते.कल्ल्यांमध्ये एक विशेष यंत्रणा काम करते जिला काउंटर करंट सिस्टीम म्हणतात. यामध्ये पाणी माशाच्या तोंडाकडून शेपटीच्या दिशेने वाहते, परंतु लॅमेलीमधील रक्त मात्र शेपटीकडून तोंडाच्या दिशेने वाहते.

म्हणजे पाणी आणि रक्त एकमेकांच्या विरुद्ध दिशेने वाहतात. यामुळे रक्ताला सतत जास्त ऑक्सिजन असलेले ताजे पाणी मिळत राहते आणि त्यामुळे मासे पाण्यातला ऐंशी ते नव्वद टक्के ऑक्सिजन शोषून घेऊ शकतात. आपली फुफ्फुसे तुलनेत हवेतला फक्त पंचवीस टक्के ऑक्सिजन शोषतात.मासे पाण्याबाहेर आल्यावर मरतात कारण कल्ले खूप नाजूक असतात.

पाण्यात असताना लॅमेली वेगळ्या होऊन तरंगतात त्यामुळे ऑक्सिजन शोषायला जास्त जागा मिळते. पण पाण्याबाहेर आल्यावर हवेच्या दाबामुळे आणि गुरुत्वाकर्षणामुळे त्या सर्व लॅमेली एकमेकांना चिकटून त्यांची घडी होते. त्यामुळे पृष्ठभाग एकदम कमी होतो आणि ऑक्सिजन शोषला जाऊ शकत नाही. शिवाय कल्ले ओले राहिल्यावरच काम करतात. कोरडे पडले की वायूंची अदलाबदल होत नाही आणि मासा गुदमरून मरतो. डॉल्फिन आणि व्हेल यांसारखे प्राणी मात्र मासे नाहीत तर सस्तन प्राणी आहेत म्हणून त्यांना कल्ल्यांऐवजी फुफ्फुसे असतात आणि श्वास घेण्यासाठी त्यांना पाण्याच्या पृष्ठभागावर यावे लागते. थोडक्यात कल्ले हे माशांचे पाण्यात श्वास घेण्याचे मुख्य साधन आहे.

### वाऱ्याचा हट्ट

डोंगराच्या अगदी माथ्यावर, जिथे गावातून येणारी पायवाट संपते, तिथे एक जुने दगडी मंदिर होते. मंदिर छोटेसेच होते, पण शेकडो वर्षांपासून उभे होते. त्या मंदिरात दुसरा कोणी देव नव्हता, फक्त एका काळ्या पाषाणावर सतत तेवत असलेला एक नंदादीप होता. गावातले म्हातारे पुजारीबुवा, ज्यांचे वय नव्वदच्या घरात होते, ते रोज सूर्य मावळायच्या आधी काठी टेकत टेकत डोंगर चढून यायचे. त्यांनी आणलेल्या पिशवीत कापसाची वात, तिळाचे तेल आणि काडेपेटी असायची.पुजारीबुवा आले की आधी पाषाण स्वच्छ पुसायचे. मग पितळेच्या समईत नवे तेल ओतायचे, वात सरळ करायची, आणि काचेती चिमणी पुसून ती समईवर ठेवायची. काडी ओढली की छोटीशी ज्योत पेटायची. ती ज्योत रात्रभर तेवत राहायची.

डोंगराच्या पायथ्यापासून ते दूरवरच्या वाड्यांपर्यंत त्या दिव्याचा मंद उजेड दिसायचा. रात्रीच्या प्रवासात चुकलेल्या वाटसरूंना तो दिवाच मंदिराची आणि गावाची वाट दाखवायचा. असाच एका आषाढातला दिवस होता. दिवसभर ढग दाटून आले होते. संध्याकाळ व्हायच्या आतच काळोख पडला. पुजारीबुवांनी कसेबसे येऊन दिवा लावला आणि ते घरी परतले. तेवढ्यात पश्चिमेकडून सोसाट्याचा वारा सुटला. तो वारा दऱ्याखोऱ्यातून शिट्या वाजवत आला आणि थेट मंदिरावर आदळला. मंदिराच्या फटीतून घुसून त्याने दिव्याची चिमणी हलवली.वारा काचेच्या चिमणीतून डोकावून दिव्याला म्हणाला, ए कारट्या, तू कोण मोठा वीर लागून गेलायस? बघ माझ्याकडे. मी मोठमोठी झाडे उन्मळून टाकतो, समुद्रात जहाजे बुडवतो. तुझ्यासारख्या चिमुकल्या ज्योतीची काय कथा? एका फुंकरमध्ये तुझा जीव घेईन. कशाला उगाच जळतोस? विझून जा आणि मला जिंकू दे.

दिव्याची ज्योत वाऱ्याच्या झोताने थरथर कापली, पण विझली नाही. तिने शांतपणे उत्तर दिले, वाऱ्यादादा, तुझी ताकद आकाशाएवढी आहे हे खरं. तू पर्वतही हलवू शकतोस. पण माझा जन्मच अंधार दूर करण्यासाठी झाला आहे. माझ्यात जोपर्यंत तेलाचा एक थेंब आहे, तोपर्यंत मी प्रकाश देतच राहणार. हा माझा धर्म आहे. मी विझलो तर वरून येणाऱ्या वाटसरूंची वाट चुकू शकते. त्यांच्या जीवावर बेतू शकते. हे ऐकून वाऱ्याचा अहंकार दुखावला. धर्म शिकवतोस मला? थांब तुला दाखवतो, असे म्हणत त्याने आपली सगळी ताकद एकवटली. तो गरगर फिरला आणि मंदिराच्या प्रत्येक फटीतून घुसला. त्याने चिमणीला धक्के दिले, पाषाणावर आपटला.

चिमणीमुळे थेट वार ज्योतीवर बसत नव्हता, पण आतली हवा गरम होऊन ज्योत सैरावैरा नाचू लागली. कधी ती लहान व्हायची, कधी मोठी. पण पुजारीबुवांनी घातलेल्या चांगल्या तेलामुळे आणि घट्ट वातीमुळे ती चिकाटीने जळत राहिली. रात्र वाढत होती. वारा तासभर थैमान घालत होता. झाडे मोडली, पत्रे उडाले. पण तो दिवा विझला नाही. शेवटी वारा दमला. त्याचा वेग मंदावला. तो हळू आवाजात म्हणाला, मी तुला हरवू शकलो नाही. इतका छोटा असून तू कसा टिकून राहिलास?तेव्हा दिवा किंचित हसून म्हणाला, दादा, तू फक्त मला बघितलंस. पण माझ्याभोवती असलेली ही काचेची चिमणी बघितली नाहीस. ही चिमणी म्हणजे माझ्यावरच्या श्रद्धेचे कवच आहे. पुजारीबुवांनी प्रेमाने घातलेले तेल म्हणजे माझी ऊर्जा आहे. आणि वात म्हणजे माझा निश्चय आहे. एकटा असतो तर तुझ्या एका झोतासरशी कधीच विझलो असतो. पण योग्य संगत, संरक्षण आणि हेतू शुद्ध असेल तर लहानातील लहान शक्तीही टिकून राहते.वाऱ्याला आपली चूक उमगली. तो शरमिंदा झाला. त्याने हळूच दिव्याच्या ज्योतीला स्पर्श केला, पण यावेळी विझवण्यासाठी नाही, तर दर्शन घेण्यासाठी. त्या रात्री पावसात अडकलेले तीन वाटसरू त्या दिव्याचा उजेड पाहूनच सुखरूप मंदिरापर्यंत पोहोचले आणि त्यांचा जीव वाचला. त्या दिवसापासून वारा जेव्हा कधी मंदिराजवळून जायचा तेव्हा तो हळूवार वाहायचा, जणू दिव्याला त्रास होऊ नये म्हणून.

बोध : आयुष्यात आपल्यापेक्षा अनेकपटीने मोठी संकटे येतात. त्या वेळी आपली ताकद कमी पडते. पण जर आपला हेतू प्रामाणिक असेल, आपल्याला गुरुंचे किंवा मोठ्यांचे मार्गदर्शनरूपी संरक्षण असेल, आणि आपण आपला निश्चय ढळू दिला नाही, तर कितीही मोठे वादळ आले तरी आपण आपले काम करत राहू शकतो. एकट्याने लढणे अवघड असते, पण चांगल्या मूल्यांची सोबत असेल तर लहान पणतीसुद्धा आभाळाएवढा अंधार दूर करू शकते.

## जीवन का अमृत (भाग १)



### श्रद्धालू शिष्य

६२. हर एक के भौतिक शरीरों में बदलाव की प्रवृति होती है और वे भोजन, मौसम, ऋतु, उम्र आदि से प्रभावित होते हैं । प्रकृति के नियम, कम या ज्यादा, सभी को प्रभावित करते हैं और यह इस बात पर निर्भर करता है कि हमें उनका कितना ज्ञान है या हम उनकी कितनी उपेक्षा करते हैं ।

एक श्रद्धालु शिष्य को, जो सादा; सतर्क जीवन जीता है और सतगुरु को सब कुछ समर्पित कर देता हैं, कर्मों के प्रभाव की ओर ज्यादा ध्यान नहीं देना चाहिए। भक्ति सदा ही मुश्किल रास्ते से विजय पाती है।

६३. निष्काम सेवा, ऐसी सेवा है जिसके बदले में हम कोई इनाम या प्रसिद्धि नहीं चाहते। यह कोई, जोर-जबरदस्ती की बात नहीं हैं, बल्कि

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### देणे घेणे

आपण विचार केला की, जेव्हा आपण दुसऱ्यांना मान देऊ तेव्हा बदल्यात ते तो आपल्याला देतील. पण प्रत्यक्षात, आपण दुसऱ्यांना तेच देतो जे आपल्या आत असतं. त्यामुळे आपल्याला तेच मिळतं किंवा आपण त्याचा अनुभव घेतो. जेव्हा तुम्ही चिडता तेव्हा त्याची जाणीव सर्वात आधी कोणाला होते?

सुरेश ओबेरॉय : मला.

शिवानीदीदी : तुम्ही जर इतरांना मान दिलात तर तो आधी तुम्हाला मिळतो त्याचप्रमाणे हे देणं आणि घेणं नसून घेणं आणि देणं आहे. जो अनुभव आपण पहिल्यांदा घेतो तोच दुसऱ्यांकडे प्रसारित होतो. म्हणूनच आपलं स्वतःशी असलेलं नातं महत्त्वपूर्ण ठरतं.

आता आपल्या आधीच्या संभाषणाकडे वळू या.

तुमच्या कुटुंबातली तीन माणसं जर भावनिकदृष्ट्या कमकुवत आहेत, स्थिर किंवा सुरक्षित नाहीत, आता तुम्हाला समजेल की, त्यांच्याकडून येणाऱ्या आततायी प्रतिक्रिया ते कमकुवत

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : अहो ऐकलं का? शेजारचे जोशी रोज बायकोला 'आयलव्ह्यू' म्हणतात.
नवरा : अगं, मी पण म्हणतो की. फक्त ती ऐकायला तिथे नसते,
आणि तू ऐकायला इथे नसतेस.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* कोणता शौर्य पुरस्कार सर्वोच्च मानला जातो?

– अशोक चक्र

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारवेद – आरोग्य संवर्धन

### कांदा

मूत्रल, कामोद्दीपक

आधुनिक शास्त्रानुसार :

कांद्यात कॅल्शिअम, ल्युमिनअम, लिग्नीन आणि अ, ब, जीवनसत्त्व, गंधक, फॉस्फरिक आम्ल, तंतुमय पदार्थ, स्निग्धता असे अनेक औषधी गुणधर्म आहेत.

उपयोग : १) बेशुद्ध अवस्थेत असणाऱ्या रुग्णास कांदा फोडून त्याचा वास दिल्यास तो रुग्ण लवकर शुद्धीवर येतो.

२) वंध्यत्व असणाऱ्या पुरुषाने नियमितपणे कांदासेवन करावे.

३) लघवी थेंब थेंब होत असेल, तसेच लघवी होताना जळजळ होत असेल, तर कांदा अर्धा लिटर पाण्यात उकळून ते पाणी थंड झाल्यावर प्यावे. यामुळे लघवीची जळजळ थांबून लघवी साफ होते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# वन्य प्राण्यांची तहान भागवण्यासाठी लोकसहभागातून पानवठे

**कामरगावच्या वन्यप्राणी सेवा समितीचे कार्य स्तुत्य आणि प्रेरणादायी : डॉ.सुधाताई कांकरिया**



गाव कुसाबाहेर सुमारे तीन किलोमीटर अंतरावर कहाळ्याच्या डोंगरावर कामरगावचे सरपंच तथा वन्यप्रेमी तुकाराम कातोरे व वन्य प्राणी सेवा समितीच्या वतीने वन्य प्राण्यांची तहान भागवण्यासाठी लोकसहभागातून जागोजागी पानवठे केलेले आहेत त्यांची पाहणी करताना नेत्ररोगतज्ञ डॉ. प्रकाश कांकरिया व सौ. सुधाताई कांकरिया यांनी प्रत्यक्ष भेट दिली.

नगर – दुपारच्या मध्यानची वेळ ... आगडोंम ओकणारा सूर्य.... निर्मनुष्य परिसर .. चिट पाखरांचा चिवचिवाट ... किर्र झाडाझुडपांनी, लता वेलीनी नटलेला डोंगर.. तेथे जाण्यासाठी खाच खळग्यांची ठेसाळणारी वाट... डोंगरावर केलेली पाणवठे.... त्यात पाणी सोडून मिळालेला परमानंद ... हे वास्तववादी चित्र नगर तालुक्यातील कामरगाव येथील वन विभागात पाहावयास मिळते गाव कुसाबाहेर सुमारे तीन किलोमीटर अंतरावर कहाळ्याच्या डोंगरावर कामरगावचे सरपंच तथा वन्यप्रेमी तुकाराम कातोरे व वन्य प्राणी सेवा समिती च्या वतीने वन्य प्राण्यांची तहान भागवण्यासाठी लोकसहभागातून जागोजागी पानवठे केलेले आहेत त्यांची पाहणी करण्यासाठी भर दुपारी कडक उन्हात नेत्ररोगतज्ञ डॉ. प्रकाश कांकरिया व सौ. सुधाताई कांकरिया यांनी प्रत्यक्ष भेट दिली पानवठे पाहून उभयतांना गहिवरून आले. डोंगरी इलाख्यात हरीण, ससे, मोर, बिबटे, लांडगे, तरस, रानडुक्कर आदी वन्य प्राण्यांचा मुक्त अधिवास आहे.

ऐन उन्हाळ्यात या प्राण्यांना पाण्याच्या शोधार्थ सैरभर धावावे लागते असे असले तरी वन्य प्राणी सेवा समितीने लोकसहभागातून जागोजागी केलेले पाणवठे व पाण्याचे नियोजन स्तुत्य व प्रेरणादायी असल्याचे मत डॉ. कांकरिया दाम्पत्यांनी व्यक्त केले. या कार्यासाठी त्यांनीभरभरून मदत करण्याचे आश्वासन दिले

कामरगावच्या सेवा समितीने केलेले कार्य इतर ठिकाणच्या वन विभागात लोकांनी केले पाहिजे असे मत डॉ.प्रकाश कांकरिया यांनी व्यक्त केले.

वनविभागात नव्याने केलेल्या पाणवठ्यात पशु पक्ष्यांची तहान भागवण्यासाठी डॉक्टर प्रकाश कांकरिया व सुधाताई कांकरिया यांच्या हस्ते टँकरने आणलेले पाणी त्यांच्या हस्ते सोडण्यात आले. या प्रसंगी वन्य प्राणी सेवा समितीचे अध्यक्ष तुकाराम कातोरे, ग्रंथालय चळवळीचे सुखदेव वेताळ, वन्यप्राणी छायाचित्रकार राजेश परदेशी, वन्यप्रेमी हितेश ओबेरॉय, दिलीप नानेकर, अंबादास रोहोकले, बाळासाहेब ढवळे, अनिल ठोकळ, भाऊसाहेब टकले राजू साठे, वन कर्मचारी सखाराम येणारे इत्यादी उपस्थित होते

### मानकन्हैया ट्रस्ट कडून दहा हजार रुपयाची मदत

डोंगर इलाख्यात वन्यप्राण्यांची तहान भागवण्यासाठी डॉ. कांकरिया दाम्पत्यांनी त्यांच्या मानकन्हैया ट्रस्ट कडून दहा हजार रुपयाचे चेक दिला व त्यांना वन्यप्राणी सेवा समितीचे पारदर्शक काम पाहून आनंद वाटला.

पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्ष वेली पशुपक्षी यांची मोठी मदत होते त्यांना तारक होण्यासाठी वन विभागात वृक्ष लागवडत्यांचे संवर्धन त्या सोबत पशुपक्ष्यांसाठी पाणवठ्याची सुविधा निर्माण करण्याची जबाबदारी आपण घेतली पाहिजे त्यासाठी या गावात वन्यप्राण्यांच्या सेवेत राबणारे हात पवित्र आहेत, असे डॉ. सुधाताई कांकरिया म्हणाल्या.

वन विभागात पाणवठे तयार करणे व त्यात पाणी सोडण्याचे काम लोकसभागातून होते त्यासाठी गावात होणारे लग्न समारंभ लग्न वाढदिवस वाढदिवस, शुभ कार्य व वर्षश्राद्ध इत्यादी कार्यक्रमात लोक मदत करतात. त्यामुळे हे कार्य चालू राहते यातून देणाऱ्याला व आम्हांला आनंद मिळतो, असे सरपंच तुकाराम कातोरे म्हणाले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## जगात देव एकच




जगात देव एकच आहे. त्याला ना जन्म, ना मृत्यू, ना आदि, ना अंत, ना रंग, ना रूप. ना आकार ना विकार जसा तुम्ही कराल विचार, तसा तो दिसेल.

संस्कृतचा एक श्लोक सांगतो की, तुम्ही समजा आहेत वेगवेगळे देव. करा नमस्कार तुम्हाला हव्या त्या देवाच्या नावाने, पण ते सगळे पोचतात एका केशवालाच. पावसाचे पाणी नाही का, महाराष्ट्रातील असो की सौराष्ट्रातील, जाऊन मिळते सागरालाच. कारण तुम्ही एकाला नमस्कार केलात म्हणून दुसरा देव रुसणार नाही, रुसत नाहीत म्हणून तर ते देव होतात. ते रुसत नाहीत, कारण त्यांना कशाचीही इच्छा असत नाही.

माणसाने मानलेले देव अगणित आहेत. माणसानेच आपल्या फायद्यासाठी त्यांना निर्माण केले आहे. ज्याला शेंदूर लागला तो देव. नसला शेंदूर, तर दगड म्हणून फेकतील माणसाचे दूर. कसले दुःख दूर करणार असले देव ?

खरे तर देव एकच. पण जो सांगतो, की देव आणखी आहेत कितीतरी. तो समजावे चळला अंतरी. त्याच्या बुद्धीला ग्रहण लागले आहे असमंजसपणाचे. दयाळनाथही म्हणतात.

म्हणून तो अक्षर. अमर, अचल, अढळ, अमळ न तया झीज एवढीही, पण हे ज्यांना समजत नाही त्यांना साक्षर म्हणू नये. त्यांच्यापेक्षा तो एकच आहे, हे म्हणणारा निरक्षर लाखपटींनी बरा.

एक जुनी कहाणी आहे. याच देशात एके काळी अनेक देव मानणाऱ्यांचे पेव फुटले होते. ब्रह्मा, विष्णू, महेश ही एकच देवता. पण लोकांनी बनविले त्यांना वेगवगळे. काही भजायचे विष्णूला तर काही शंकराला. भयंकर राग करायचे शैव आणि वैष्णव एकमेकांचा. एक असाच वैष्णव होता घंटाकण नावाचा. एका विष्णूशिवाय दुसऱ्या शिवाचं नाव कानी पडू नये, म्हणून त्याने म्हणे कानाला घंटा बांधून ठेवल्या होत्या. दुसऱ्यांनी उच्चारलेले शिवाचे नाव, घंटानादात कोठून पडणार कानावर ?

एकदा विष्णूंनाच वाटले, की हा घंटाकर्ण एवढा आपला थोर भक्त. पण त्याच्यात हा दुजाभाव वाईट. तो जावा म्हणून विष्णूंनी एकाच शरीरात दोन रूपे धारण केली. अर्धा शिव, अर्धा विष्णू, एक तोंड शिवाचे, तर त्यालाच चिकटून दुसरे विष्णूचे, असे विष्णू राहिले उभे घंटाकर्णापुढे. तो तेव्हा विष्णूचीच पूजा करीत होता. विष्णूच्या मूर्तीपुढे त्याने उदबत्ती लावली होती. तेवढ्यात विष्णू पुढे आले. घंटाकर्ण नतमस्तक झाला. पण तेवढयात त्याला शंकरांचे तोंड दिसले. उदबत्तीचा वास दरवळत होता. शंकरालादेखील तो वास मिळेल. घंटाकर्ण खवळला. शंकराला उदबत्तीचा वास नको जायला. त्याने लगेच शंकराच्या नाकात बोटे खुपसली.

कट्टरता कोठल्याही क्षेत्रात असो, ती नेते माणसाला रसातळाला. **– किशोर गांधी**

# हुंडेकरी अॅकॅडमीच्या कार्तिक करांडेची 'महाराष्ट्र राज्य क्रिकेट संघात' निवड

**डिसीसीआयच्या एलिट फिजिकल डिसेब्लिटी टी ट्वेंटी चॅम्पियनशीपमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार**



नगर – जिल्ह्यातील हुंडेकरी स्पोर्ट्स अॅकॅडमीचा क्रिकेटपटू कार्तिक वैभव करांडे याची DCCI (डिफरंटली एबल्ड क्रिकेट कौन्सिल ऑफ इंडिया) आयोजित पाचव्या एलिट फिजिकल डिसेब्लिटी T20 चॅम्पियनशीप २०२६ साठी महाराष्ट्र राज्य क्रिकेट संघात निवड झाली आहे.

बंगळुरू येथे १७ ते २७ मे या कालावधीत होणाऱ्या डीसीसीआयच्या खुल्या वयोगटातील मुलांच्या T20 क्रिकेट स्पर्धेत कार्तिक महाराष्ट्र राज्य डिसेब्लिटी क्रिकेट संघाचे तो प्रतिनिधित्व करणार आहे. देशभरातील विविध राज्यांतील गुणवंत खेळाडू या स्पर्धेत सहभागी होणार असल्याने ही स्पर्धा अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

कार्तिक हा उजव्या हाताचा आक्रमक फलंदाज असून डावखुरा फिरकी गोलंदाज म्हणूनही त्याने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. मैदानावरील त्याचा आत्मविश्वास, सातत्यपूर्ण सराव आणि संघासाठी खेळण्याची जिद्द यामुळे त्याने अल्पावधीतच प्रशिक्षक आणि निवड समितीचे लक्ष वेधून घेतले. यापूर्वीही त्याने १४ व १६ वर्षांखालील मुलांच्या महाराष्ट्र राज्य क्रिकेट संघटनेच्या आमंत्रित क्रिकेट स्पर्धेत विजय क्लब, पुणे संघाचे प्रतिनिधित्व करून उल्लेखनीय कामगिरी बजावली होती. तो सध्या अहिल्यानगर येथील हुंडेकरी स्पोर्ट्स अॅक्डमीमध्ये प्रशिक्षक सरफराज बांगडीवाला यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहे.



नवीपेठ येथील श्री जैन ओसवाल धर्मशाळेची नूतन कार्यकारिणी जाहीर झाल्यानंतर पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

# नवीपेठ येथील श्री जैन ओसवाल धर्मशाळेची नूतन कार्यकारिणी जाहीर

**अध्यक्षपदी बाळासाहेब भंडारी यांची निवड**

नगर – अहिल्यानगर येथील जैन समाजाच्या मालकीच्या नवीपेठ येथील श्री जैन ओसवाल धर्मशाळा या सामाजिक ट्रस्ट वर धर्मदाय उपायुक्त यांचे आदेशाने १५ जणांची विश्वस्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नवीन विश्वस्तांची कार्यकारिणी सभा ज्येष्ठ विश्वस्त अजीत बोरा यांचे अध्यक्षतेखाली संपन्न होऊन संस्थेच्या अध्यक्षपदी जैन ओसवाल समाजाचे विश्वस्त चंद्रकांत (बाळासाहेब) रतनलाल भंडारी यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.

त्याचबरोबर संस्थेच्या उपाध्यक्षपदी सतीश नेनसुख मुथा, सरचिटणीसपदी धनेश मोतीलाल भंडारी, कोषाध्यक्षपदी राजेंद्र पन्नालाल डागा, चिटणीसपदी संदीप सुरजमल चोपडा यांची एकमताने निवड करण्यात आली. अजीत सिमरतमल बोरा, मिलापचंद हरकचंद पटवा धनराज माणिकचंद गांधी, सतिश कनकमल चंगेडे, विजय मोतीलाल गुंदेचा, राजकुमार फुलचंद मुनोत, विनोद हिरालाल भंडारी, नरेश रतीलाल फिरोदिया, शिरीष कुंतीलाल कटारिया, सुरेश मदनलाल फिरोदिया यांची संस्थेवर विश्वस्त म्हणून निवड झाली आहे. चंद्रकांत भंडारी म्हणाले की, जैन ओसवाल धर्मशाळेला मोठी वैभवशाली परंपरा आहे. आगामी काळात सर्वांना सोबत घेऊन संस्थेला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. नवीन विश्वस्त मंडळ एकदिलाने काम करण्यासाठी कटिबद्ध आहे. त्यामुळे संस्था पुन्हा एकदा चांगल्या कामामुळे नावारूपाला येईल असा विश्वास आहे.

# दत्तात्रय आभाळे यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार जाहीर



नगर – सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल येथील शालेय शिक्षक दत्तात्रय पांडुरंग आभाळे यांना 'राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार २०२६' जाहीर करण्यात आला आहे. नाशिक येथील ज्ञानदीप सामाजिक विकास संस्थेच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते त्यांचा गौरव केला जाणार आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा २३ मे रोजी सायंकाळी ४ वाजता नाशिक येथील वावरेनगर, कामटवाडे येथे आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यास रिपब्लिकन सेनेचे अॅड. अमन आंबेडकर (डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पंतू), नाशिक पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, समाजकल्याण विभागाचे उपायुक्त भगवान वीर, जिल्हा पुरवठा अधिकारी रमेश गायकवाड, रिपब्लिकन सेनेचे राज्य प्रवक्ते अविनाश शिंदे तसेच मनपा सहाय्यक उपायुक्त नानासाहेब साळवे आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिल आठवले आणि सचिव मिलिंद कळवणकर यांनी दिली.

संगमनेर तालुक्यातील नांदूर खंदरमाळ येथील भगवती माता विद्यालयात कार्यरत असलेले दत्तात्रय आभाळे यांनी आपल्या कार्यातून शिक्षण आणि समाजसेवेचा अनोखा संगम घडवून आणला आहे. अकलापूर हे त्यांचे मूळ गाव असून, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. बालवयातच पितृछत्र हरपल्यानंतर आई आणि काकांच्या सहकार्याने त्यांनी शिक्षणाची वाटचाल सुरू ठेवली. आर्थिक आणि कौटुंबिक अडचणींवर मात करत शिक्षक होण्याचे स्वप्न त्यांनी पूर्ण केले. आज शिक्षक म्हणून कार्यरत असताना ते विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देण्यापुरते मर्यादित न राहता त्यांच्यामध्ये सामाजिक जाणीव, नैतिक मूल्ये आणि आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. ग्रामीण भागातील अनेक गरजू विद्यार्थ्यांना त्यांनी शैक्षणिक मदत व मार्गदर्शन करून शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेले अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आहेत.

शिक्षण क्षेत्राबरोबरच सामाजिक कार्यातही आभाळे यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. ग्रामीण युवकांमध्ये शिक्षणाबाबत जागृती निर्माण करणे, स्वच्छता अभियान राबविणे, पर्यावरण संवर्धन उपक्रमात सहभाग घेणे तसेच रक्तदान शिबिरांचे आयोजन अशा विविध सामाजिक उपक्रमांत त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

# पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत सात्विक दातीर यशस्वी



नगर – पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ८ वीमध्ये श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला, सावेडी येथील विद्यार्थी सात्विक दातीर याने २३४ गुण (७८ टक्के) मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

सात्विक दातीर हा अभ्यासात सातत्य राखणारा तसेच त्याने नुकत्याच झालेल्या राज्यस्तरीय रगबी या खेळात जिल्हाचे प्रतिनिधित्व केले होते. शैक्षणिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणारा विद्यार्थी म्हणून ओळखला जातो. पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेसारख्या स्पर्धात्मक परीक्षेसाठी त्याने नियमित अभ्यास, सराव आणि नियोजनबद्ध तयारी केली होती. त्याच्या या यशामागे श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला सावेडी येथील शिक्षकांचे विशेष मार्गदर्शन लाभले. शाळेच्या मुख्याध्यापिका वसुंधरा जोशी यांनी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यावर भर दिला असून उपमुख्याध्यापक लक्ष्मीकांत कुलकर्णी यांनीही सातत्याने विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

या परीक्षेच्या तयारीदरम्यान शिक्षक अनुराधा शास्त्री आणि भोराजी पथवे यांनी सात्विकला विषयानुरूप मार्गदर्शन करत त्याचा आत्मविश्वास वाढविला. तसेच महेश डाळिंबकर सरांचेही त्याला विशेष मार्गदर्शन लाभले.

सात्विकचे वडील पत्रकार निशांत वसंतराव दातीर आणि आई इंजिनियर शोभा निशांत दातीर यांनी मुलाच्या यशाबद्दल समाधान व्यक्त केले.

# सहकारी संस्थांच्या निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या नामतालिकेसाठी पात्र व्यक्तींनी ३१ मेपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

नगर – महाराष्ट्र राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांच्या निर्देशानुसार सहकारी संस्थांच्या निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांची ३ वर्षांसाठी नामतालिका तयार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यासाठी पात्र व्यक्तींनी ३१ मे पर्यंत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांच्या कार्यालयात अर्ज व आवश्यक कागदपत्रे दोन प्रतींत सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. 'क' व 'ड' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्तीच्या प्रक्रियेसाठी सहकार खात्यातील सेवानिवृत्त अधिकारी–कर्मचारी, शासकीय विभाग व स्थानिक स्वराज्य संस्थांतील सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी, वकील, सनदी लेखापाल, प्रमाणित लेखापरीक्षक, स्थानिक स्वराज्य संस्थेतील व खासगी अनुदानित शाळांमधील सेवानिवृत्त शिक्षक, तसेच सहकारी संस्थांतील कार्यरत व सेवानिवृत्त अधिकारी–कर्मचारी आणि निवडणूक कामकाजाचा अनुभव असलेल्या व्यक्तींना अर्ज करता येणार आहे.

नामतालिका तयार करण्यासाठी ३० एप्रिल २०२६ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून अर्ज स्वीकृतीची प्रक्रिया १ ते ३१ मे या कालावधीत सुरू राहणार आहे. प्राप्त अर्जांची छाननी १ ते १५ जून दरम्यान करण्यात येईल. त्यानंतर पात्र निवडणूक निर्णय अधिकारी व प्राधिकृत अधिकारी यांची नामतालिका १६ ते २३ जून या कालावधीत तयार करण्यात येणार आहे. अंतिम यादी ३० जून रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांच्याकडे सादर करण्यात येणार आहे. हे अर्ज व आवश्यक कागदपत्रे संबंधित जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर करावीत, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण व सहकार आयुक्त यांच्या संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



कुष्ठधाम रोड येथे नव्याने सुरू झालेल्या 'एस. के. पेढा' या मिठाई व भट्टीवरील ताज्या पदार्थांच्या प्रतिष्ठानाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते पार पडले.

# एस. के. पेढाच्या पाचव्या शाखेचे सावेडीत उद्घाटन

नगर – सावेडी परिसरातील कुष्ठधाम रोड येथे नव्याने सुरू झालेल्या 'एस. के. पेढा' या मिठाई व भट्टीवरील ताज्या पदार्थांच्या प्रतिष्ठानाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते पार पडले. या उद्घाटन सोहळ्याला प्रसंगी आमदार अक्षय कर्डिले, नगरसेवक कुमार वाकळे, नगरसेवक महेश लोंढे, संचालक प्रताप चितळकर, दादाभाऊ चितळकर, पी. एस. बोरकर, सिद्धेश्वर चितळकर, रमेश कुंडकर, संजय वाघमोडे, शंकर पडोळकर, हरिभाऊ गिरवले, रभाजी सुळ, अशोक झरेकर, संजय गिरवले, सागर कारळे, इंगळे सर उपस्थित होते. उपस्थितांनी प्रतिष्ठानच्या आकर्षक सजावटीचे व दर्जेदार चवीचे विशेष कौतुक केले.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले, अहिल्यानगर शहर झपाट्याने विस्तारत आहे. अशा वेळी नागरिकांना शुद्ध, दर्जेदार आणि पारंपरिक चव देणारे व्यवसाय उभे राहणे ही आनंदाची बाब आहे. 'एस. के. पेढा'मध्ये भट्टीवर तयार होणारे ताजे पदार्थ आणि उत्कृष्ट दर्जाचे पेढे ग्राहकांच्या नक्कीच पसंतीस उतरतील. स्थानिक तरुण उद्योजकांनी व्यवसायाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती करत शहराच्या विकासात योगदान द्यावे.

एस के पेढेचे संचालक प्रताप चितळकर यांनी सांगितले की, आमच्या कुटुंबाचा सुरुवातीपासून दुधाच्या व्यवसायाशी घनिष्ठ संबंध आहे. ग्राहकांनी दिलेल्या प्रचंड प्रतिसादामुळे आम्ही व्यवसायाचा विस्तार करत आता 'एस. के. पेढा'ची पाचवी शाखा सुरू केली आहे. ग्राहकांना शुद्धता, दर्जा आणि पारंपरिक चव एकाच ठिकाणी मिळावी हा आमचा प्रयत्न आहे. 'एस. के. पेढा'मध्ये पारंपरिक लाकडी भट्टीवर तयार केलेले स्पेशल पेढे, दाणेदार खवा, कुंदा, मलाई पेढा यांसह खुसखुशीत खारी, बटर, नानकटाई, विविध बेकरी पदार्थ तसेच फराळाचे अनेक स्वादिष्ट पदार्थ ग्राहकांसाठी उपलब्ध करण्यात आले आहेत.

# समुहपदेशन काळाजी गरज

आजच्या वेगवान आणि तणावपूर्ण जगात समुहपदेशन हे मानसिक आणि भावनिक आरोग्यासाठी एक अत्यंत आवश्यक गरज आहे बदलत्या जिवनशैली मुळे तणाव, चिंता, नैराश्य, नातेसंबंधातील समस्या यासारख्या अनेक आव्हांनाना तोंड द्यावे लागते अशा वेळी समुहपदेशन आपल्याला या समस्येवर मात करण्यासाठी स्वतःला अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी आणि आवश्यक कौशल्य आत्मसात करण्यासाठी एक सुरक्षित जागा आवश्यक असते.

तणाव आणि चिंता व्यवस्थापन : तणाव, चिंता, राग, यासारख्या कठीण भावनांना कसे समोर जावे यासाठी समुहपदेशन मदत करते.

**समुहपदेशनाचे फायदे:**

१. आत्म शोध आणि विकास : समुहपदेशन व्यक्तीला स्वतःच्या भावना, विचार आणि वर्तणुक बदल अधिक माहिती मिळण्यास मदत करते ज्यामुळे आत्मजाग्रकता आणि वैयाकतिक वाढ होते.

**२. नातेसंबंध सुधारते :** समुहपदेशन कौटुंबिक, सामाजिक आणि व्यावसायिक नातेसंबंध सुधारणा घडु शकते समूहपदेशन ही एक उपचारात्मक प्रक्रिया आहे ज्यामध्ये एक प्रशिक्षित व्यावसायिक समुहददेशक व्यक्ती, जोडपे, किंवा कुटूंबातील सदस्याला मानसिक, भावानिक, किंवा वैयाकतेक समस्यावर मात करण्यासाठी मदत करते या प्रक्रियेत समुहपदेशक आणि समस्या ग्रस्त व्यक्ती यांच्यात विश्वासाई आणि गोपनिय संवाद साधला जातो ज्यामुळे समस्याग्रस्त व्यक्तीला त्याच्या समस्यांचा अर्थ लावता येतो आणि त्यावर तोडगा काढता येतो.

**समुहपदेशन प्रकार :**

**१. वैयक्तिक समुपदेशन :** या प्रकारात एक व्यक्ती समुपह्देशका सोबत एकांतवासात बोलत असतो आणि त्याच्या भावना, विचार व वर्तनावर चर्चा करतो.

**२. गट समूहपदेशन :** Group counseling यामध्ये समूहपदेशन घेणारी व्यक्ती इतर लोंकाशी संवाद साधते, जे एकाच प्रकारच्या समस्यांन तोंड देत असतात. त्यामुळे इतरांच्या अनुभवातुन शिकता येते आणि एकमेंकाना भावानिक आधार मिळतो.

**३. कौटुबिक समुपदेशन** family counseling : जेव्हा कुंटुबातील सदस्यामध्ये संवाद किंवा संबंधा मध्ये अडचणी येतात तेव्हा हे समुपदेशन उपयोगी पडते यामध्ये कौंटुबिक संबंध सुधारते .

**४. जोडप्यांचे समुपदेशन** couple counseling : हे विशेषत : पत्नी व पती यांच्यासाठी असते जे त्यांच्या नातेसंबंधातील समस्या सोडवण्यासाठी एका समुपदेशक कडे जातात .

**५. मानसिक आरोग्य समुपदेशन :** Mental Health Counseling चिंता नैराश्य किंवा इतर मानसिक आरोग्याच्या समस्यांनी त्रस्त असलेल्या लोंकासाठी हे एक उपयोगी ठरते

६. शालेय समुपदेशन School Counseling विद्यार्थी आणि त्यांच्या शैक्षणिक तसेच भावनिकदृष्ट्या त्यांचा विकास होण्यासाठी उपयोगी ठरते

७. करिअर समुपदेशन Career Counseling करिअर निवडण्यात किंवा करिअरमधील बदलांशी जुळवून घेण्यास मदत करण्याराठी हे केले जाते.

**उद्देश** : समस्या ग्रस्त व्यक्तीच्या समस्या सोडवणे हा असतो.

**समुपदेशनाच्या पायऱ्या :** समुपदेशनाच्या प्रमुख पायऱ्या यामध्ये संबंध प्रस्थापित करणे समस्यांचे मुल्यमापन करणे, ध्येय निश्चित करणे, उपाययोजना आखणे आणि अमलात आणणे आणि मुल्यमापण यांचा समावेश असतो.

**१. संबध प्रस्थापित करणे :** Rapport Building : समुहपदेशनाची पहिली पायरी व महत्वाची पायरी म्हणजे दोघात एक विश्वासही, सुरक्षित आणि मोकळे नाते निर्माण करणे यामध्ये समुहपदेशक सक्रिय एकतो, सहानुभूती दाखतो आणि व्याक्तेका आरामदायक आणि समजून घेतो.

**२. समस्येचे मुल्यांकन आणि निदान** Assessment and Diagnosis : एकदा नाते निर्माण झाल्यावर समुपदेशक व्यक्तीला भेडसावत असणाऱ्या समस्या, आव्हाने आणि त्यांच्या भावनिक, मानासिक तसेच सामातिक पैलु समजन घेण्याचा प्रयत्न करतो

**३. ध्येय निश्चित करणे :** व्यक्तीच्या गरता आपि समस्येवर आधारावर समुपदेशक व्यक्ती सोबत मिळून काही स्पष्ट साध्य करता येणेजोगी ध्येय निश्चित करतात हेध्येय व्यक्तीच्या वाढीसाठी आणि आव्हांनाना समोरे जाण्यासाठी मदत करतात

४. उपचार ध्येय प्राप्ती करण्यासाठी योग्य उपचार पद्धती आपि तंत्रे वापरतो त्यामध्ये coping skills शिकवता त्याच्या भावना आणि विचारावर नियंत्रण मिळवण्या साठी मदत करतो.

**५. मुल्यांकन आणि समाप्ती :** Evaluation and Termination समुपदेशनात व्यक्तीच्या प्रगतीचे नियमित पणे मुल्यांका केले जाते जेव्हा व्यकती आपली ध्येये गाठतो किंवा समस्येवर नियंत्रण मिकवतो तेव्हा समुददेशक समुपदेशनाची तंत्राचो सम्पाती करतो.

वरील लेख आवडल्यास आपले Feedback (अभिप्राय) जरुर देणे. जर तुम्हाला महाविद्यालये, शाळा, स्वयंसेवी संस्थांमध्ये तणाव व्यवस्थापन आणि मानसिक आरोग्य, जीवनशैलीशी संबंधित आजार, वाईट वृत्ती, वैवाहिक समस्या इत्यादी विषयांवर समुपदेशनासाठी कार्यशाळा किंवा सेमिनार आयोजित करायचे असतील. आणि जर तुम्हाला समुपदेशन शिकण्यात रस असेल आणि त्याबद्दल अधिक ज्ञान मिळवायचे असेल, तर कृपया प्रवीण साबळे यांच्याशी मोबाईल नंबर ९२७००७०८४६ वर संपर्क साधा.

**हॉस्पिटल समन्वयक,**
**इव्हँजेलिन बूथ हॉस्पिटल, अहिल्यानगर**





अहिल्यानगर शाखेतर्फे आयकर विभागाच्या संयुक्त विद्यमाने नवीन आयकर कायदा २०२५ या विषयावर विशेष आउटरीच कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास चार्टर्ड अकाउंटंट्स, कर सल्लागार व्यावसायिक तसेच विविध क्षेत्रातील नागरिकांचा प्रतिसाद लाभला.

# अहिल्यानगर सीए शाखा व आयकर विभाग आयोजित नवीन आयकर कायदा जनजागृती कार्यक्रमास प्रतिसाद

नगर – अहिल्यानगर शाखेतर्फे आयकर विभागाच्या संयुक्त विद्यमाने नवीन आयकर कायदा २०२५ या विषयावर विशेष आउटरीच कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास चार्टर्ड अकाउंटंट्स, कर सल्लागार व्यावसायिक तसेच विविध क्षेत्रातील नागरिकांचा प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शाखाध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया यांनी उपस्थितांचे स्वागत करत नवीन आयकर कायद्यातील बदल समजून घेण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी नवीन आयकर कायदा २०२५ मधील महत्त्वपूर्ण तरतुदी, अनुपालन प्रक्रिया तसेच बदलत्या करप्रणालीशी सुसंगत राहण्यासाठी करदात्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी आयकर आयुक्त डॉ. उमेश फडे यांनी नवीन आयकर कायदा २०२५ मधील बदल, कर प्रशासनातील पारदर्शकता तसेच करदात्यांनी अनुपालन करताना घ्यावयाची दक्षता यावर सविस्तर मार्गदर्शन केले. आयकर अधिकारी प्रकाश हजारे यांनी नवीन कायद्यातील प्रक्रिया व प्रत्यक्ष अंमलबजावणीतील महत्त्वाच्या बाबी स्पष्ट केल्या. तसेच गौरव कुमार यांनी करदात्यांसाठी सुलभ अनुपालन प्रणाली व डिजिटल प्रक्रियेविषयी मार्गदर्शन केले.

सीए प्रसाद भंडारी यांनी चार्टर्ड अकाउंटंट्सच्या दृष्टीकोनातून नवीन आयकर कायद्यातील व्यावहारिक बाबी, कर नियोजन तसेच व्यावसायिकांसमोरील आव्हाने आव्हानांवर सखोल विवेचन केले.

या कार्यक्रमास अहिल्यानगर सीए शाखेचे माजी अध्यक्ष, पदाधिकारी, विविध संस्थांचे प्रतिनिधी व अधिकारी, कर सल्लागार, सनदी लेखापाल, वकील तसेच नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाखाध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया यांनी केले. सूत्रसंचालन सीए काजल चंदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन माजी अध्यक्ष सीए प्रसाद पुराणिक यांनी केले. या वेळी खजिनदार सीए सुनंदा रच्चा, तसेच सर्व माजी अध्यक्ष उपस्थित होते.

# सीए अहिल्यानगर शाखेत २२ व २३ मे रोजी दोन दिवसीय सहकार प्रशिक्षणाचे आयोजन



सीए अभयकुमार कटारिया

नगर – इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (ICAI) अहिल्यानगर शाखा व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने २२ व २३ मे रोजी दोन दिवसीय सहकार मंथन २०२६ या सहकार प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती शाखेचे चेअरमन सीए अभयकुमार कटारिया यांनी दिली.

प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन राम शिंदे (सभापती, विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य) यांच्या हस्ते होणार असून, प्रमुख उपस्थिती म्हणून अनिल कवडे (माजी सहकार आयुक्त, महाराष्ट्र राज्य), आ. संग्राम जगताप, सीए सौरभ अजमेरा (WIRC चेअरमन, ICAI) तसेच मंगेश सुरवसे (जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर) यांच्या उपस्थितीत होणार आहे.

प्रशिक्षण कार्यक्रमात सहकार क्षेत्रातील विविध महत्त्वपूर्ण विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे. यामध्ये अतुल खिरवाडकर, श्रीकांत जाधव (सरव्यवस्थापक, महेश नागरी सहकारी बँक, पुणे), प्रसाद पाटील (CES, Urban Co-op Banks Federation), सीए रोहित बोरा, संदीप गादिया (पुणे), विद्याधर अनास्कर (विद्यमान अध्यक्ष, विद्या सहकारी बँक, पुणे), सीए सुनिल नागावकर, श्रीनिवास रायरीकर यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

सहकार क्षेत्रातील बदलते नियम, व्यवस्थापन, लेखापरीक्षण, बँकिंग तसेच पतसंस्थांशी संबंधित विविध महत्त्वाच्या विषयांवर या प्रशिक्षणामध्ये सखोल चर्चा करण्यात येणार आहे. या दोन दिवसीय प्रशिक्षणामुळे सहकार क्षेत्रातील कार्यपद्धती अधिक सक्षम, प्रभावी व अद्ययावत होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील पतसंस्था, बँका तसेच संबंधित पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांनी उपस्थित राहून या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अभयकुमार कटारिया यांनी केले आहे.

# उत्कृष्ट तपासासाठी कोतवाली पोलिस स्टेशनचे हेड कॉन्स्टेबल विशाल दळवी यांचा विशेष सन्मान



नगर – भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यातील खुनाच्या क्लिष्ट आणि आव्हानात्मक गुन्ह्याचा सखोल तपास करून आरोपींना अटक करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्याबद्दल कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस हेड कॉन्स्टेबल विशाल अशोक दळवी यांना अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. २७ एप्रिल रोजी भिंगार कॅम्प पोलीस ठाणे गु.र.नं. २२२/२०२६, बीएनएस कलम १०३(१), २३८ (३) (५) अंतर्गत दाखल असलेल्या गुन्ह्याचा तपास करताना मिसिंग व्यक्ती प्रसाद रोहिदास जाधव यांचा खून झाल्याचे उघडकीस आले. आरोपींनी वाकोडी शिवारातील उसाच्या शेतात लाकडी दांडक्याने मारहाण करून त्यांचा खून करून मृतदेह टाकून दिला होता.

या प्रकरणात गुप्त माहिती, तांत्रिक विश्लेषण आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास करत विशाल दळवी यांनी आरोपींचा शोध घेतला. आरोपी शुभम हरि भोसले (वय २०, रा. वाकोडी फाटा) आणि समाधान उर्फ बाळ्या रामदास सोनवणे (वय ४२, रा. बुरुडगाव) यांना अटक करून गुन्ह्याचा छडा लावण्यात आला.

विशाल दळवी यांनी केलेली कामगिरी अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलासाठी अभिमानास्पद असल्याचे नमूद करत, भविष्यातही अशीच उल्लेखनीय कामगिरी करून पोलीस दलाची प्रतिमा उंचावावी, अशा शुभेच्छा प्रशस्तीपत्रातून देण्यात आल्या.

हे प्रशस्तीपत्र अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे तसेच पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन (भा.पो.से.) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.



गौरव स्वीकारताना जाणीव फाऊंडेशनचे कैलाश दिघे, विक्रम वाडेकर, विकास जोशी व इतर.

# जाणीव फाऊंडेशनला उत्कृष्ट रक्तदान शिबिर संयोजक गौरव प्रदान

नगर – जनकल्याण रक्तपेढीच्या वतीने जाणीव फाऊंडेशनला 'उत्कृष्ट रक्तदान शिबिर संयोजक' गौरव प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष अरविंद पारगावकर, जनकल्याण रक्तपेढीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. रवींद्र साताळकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे महाराष्ट्रचे प्रांत प्रमुख प्रा. नानासाहेब जाधव, रक्तपेढीचे अध्यक्ष अभय मेस्त्री, कार्यवाह सतीश इंदांनी आदींच्या हस्ते ॲड. व इंजिनीयर कैलाश दिघे, ॲड. विक्रम वाडेकर विश्वस्त मोहटादेवी संस्थान, कर सल्लागार विकास जोशी व इतरांनी गौरव स्वीकारला.

फाऊंडेशन गेली १० वर्षे सातत्याने ३१ डिसेंबरला 'दारूच्या बाटल्या रित्या करण्यापेक्षा रक्ताच्या पिशव्या भरा' असे आवाहन करून रक्तदान शिबिरे आयोजित करत आहे. कोरोना महामारीच्या काळात शिबिरे बंद होती, रक्ताचा प्रचंड तुटवडा होता. अशा कठीण लॉकडाऊनच्या परिस्थिती मध्येही जाणीव फाऊंडेशनच्या सदस्यांनी रक्तपेढीत जाऊन रक्तदान करून रुग्णांना मोठा दिलासा दिला होता.

फाऊंडेशन वर्षभर विविध जनजागृतीचे उपक्रम राबवत असते. नायलॉन मांजा बंदी वर गेली ५–६ वर्षे सातत्याने आवाज उठवून, पाठपुरावा केल्यामुळे त्याचा वापर या वर्षी नगण्य झाला आहे. 'तिळगुळ घ्या अन् वाहतूक नियम पाळा' असे आवाहन करून रस्ते वाहतूक सुरक्षा जागृती कार्यक्रम राबविला जातो. वृक्षारोपण व संवर्धन, स्वच्छता अभियान, गरिबांसाठी विमा योजना, करिअर गायडन्स इत्यादी कार्यक्रम फाऊंडेशनचे सदस्य लोकसहभागातून राबवीत असतात.

# रक्तदान क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगरचा गौरव



जनकल्याण रक्तपेढीतर्फे उत्कृष्ट रक्तदान शिबिर संयोजक म्हणून जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगरचे संजय गुगळे यांना गौरव पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

नगर – जनकल्याण रक्तपेढीच्या वतीने उत्कृष्ट रक्तदान शिबिर संयोजक म्हणून जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगरचे संस्थापक अध्यक्ष संजय गुगळे यांना गौरव पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष अरविंद पारगावकर, जनकल्याण रक्तपेढीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. रवींद्र साताळकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे महाराष्ट्र प्रांत प्रमुख प्रा. नानासाहेब जाधव, रक्तपेढीचे अध्यक्ष अभय मेस्त्री आणि कार्यवाह सतीश इंदानी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगरने जनकल्याण रक्तपेढीचे पहिले रक्तदान शिबिर आयोजित करण्याचा मान मिळवला असून, गेली अनेक वर्षे सातत्याने रक्तदान शिबिरांचे आयोजन केले जात आहे. यासोबतच थॅलेसेमिया या आजाराविषयी जनजागृती, रक्तदानाचे महत्त्व पटवून देणे आणि समाजात रक्तदानाबाबत सकारात्मक संदेश पोहोचवण्याचे कार्यही संस्थेमार्फत केले जाते.

या सामाजिक कार्याची दखल घेत जायंट्स इंटरनॅशनलनेही जायंट्स ग्रुपचा गौरव केला असल्याची माहिती जायंट्स वेल्फेअर फाउंडेशनचे स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे यांनी दिली.

# पुण्यातील फुफ्फुसतज्ञ डॉ. हर्षल गांधी आता अहिल्यानगरमध्ये पुर्णवेळ उपलब्ध



नगर – पुण्यातील फुफ्फुसतज्ञ डॉ. हर्षल जयकुमार गांधी (Chest Specialist) हे अहिल्यानगर मधील गुरुदेव स्पेशालिटी क्लिनिक व ऑर्थोकेअर मध्ये पूर्णवेळ पेशन्टला सेवा देतील. ते स्वत: एम.बी.बी.एस. (एम. डी. रेस्पिरेटरी मेडिसिन व त्यांचे उच्च शिक्षण आयडीसीसीएम) (पुणे) येथे झालेले आहे व डिप्लोमा इन ॲलर्जी ॲण्ड आस्थमा (सी.एम.सी. वेल्लोर) ते फुफ्फुसाशी संबंधित विविध आजारांचे निदान व उपचार करण्याचा त्यांना मोठा अनुभव आहे. दमा (Asthma), COPD, क्षयरोग (TB), छातीमध्ये घरघर होणे, कफ येणे, जुनाट खोकला, सर्दी, बालदमा, निमोनिया, छातीत पाणी होणे व पू भरणे, फुफ्फुसाचा कॅन्सर व निदान, फुफ्फुसाचे जाळीकरण, धुर व धुळीमुळे होणारे श्वसनाचे विकार, दुर्बिणीद्वारे फुफ्फुसाची तपासणी, घोरण्याचे आजार, निदान व उपचार, पी. एफ. टी. श्वास लागणे तसेच विविध ॲलर्जी व इतर श्वसन विकारांवर ते आधुनिक व प्रभावी उपचार देतात. आपल्या श्वसन आरोग्यासाठी विश्वासार्ह तज्ञ व समर्पित वैद्यकीय सेवा मिळवण्यासाठी आजच गुरुदेव स्पेशालिटी क्लिनिक ॲण्ड ऑर्थो केअर येथे भेट द्या. (वेळ व संपर्क क्रमांक येथे नमुद करा)

ओ.पी.डी.वेळ : सोमवार ते शनिवार सकाळी ९.०० ते १२.००

सायंकाळी ८.०० ते १०.०० वाजेपर्यंत

संपर्क :– ९११२१०८१०८

पत्ता : गुरुदेव स्पेशालिटी क्लिनिक व ऑर्थोकेअर, आयरीश हॉटेल समोर, माणिकनगर, अहिल्यानगर

# मुंबईतील डायबेटीक फुट सर्जन डॉ. ऋषभ गांधी आता प्रथमच अहिल्यानगरमध्ये पुर्णवेळ उपलब्ध



नगर – मुंबईतील एस.एल. रहेजा हॉस्पिटल येथील सुपर स्पेशालिटी डायबेटीक फुट सर्जन डॉ. ऋषभ दिलीप गांधी प्रथमच आता आपल्या अहिल्यानगरमध्ये गुरुदेव स्पेशालिटी क्लिनिक ॲण्ड ऑर्थोकेअर, माणिकनगर, अहिल्यानगर येथे पुर्णवेळ उपलब्ध राहतील. ते स्वतः एम.बी.बी.एस. एम.एस. (जनरल सर्जरी), त्यांचे उच्च शिक्षण एफ. डी. एफ. एस. (Fellowship in Diabetic foot surgery, MUHS) झालेले आहे.

**त्यांच्याकडुन अत्याधुनिक उपचार पुढील प्रमाणे –** पायाला जखम होणे/ न भरणाऱ्या जखमा, पायाची जखम बरी होण्यासाठी टॉपिकल ऑक्सिजन थेरपी प्रथमच अहिल्यानगरमध्ये उपलब्ध, पायात मुंग्या येणे, जळजळ होणे, पायाला सूज येणे, लालसरपणा, चालताना वेदना होणे, बोटांना किंवा पायाच्या भागाला काळपटपणा,

**आमच्या सेवा –** मधुमेही पायाची सखोल तपासणी, जखम व्यवस्थापन (Wound Care) प्रेशर ऑफलोडिंग व विशेष ड्रेसिंग, संसर्गावरील (Infection) उपचार, रक्तपुरवठा तपासणी व उपचार (Doppler/Vascular Evaluation), लहान मोठ्या शस्त्रक्रिया, पायाचे अल्सर व गॅंग्रीनवरील उपचार, पाय कापण्याची (Amputation) वेळ येऊ नये यासाठी प्रगत उपचार इत्यादी.

वरील सर्व रोगांचे निदान वेळीच केल्यास पाय वाचू शकतो, आयुष्य सुरक्षित राहू शकते.

ओ.पी.डी. वेळ : सोमवार ते शनिवार सकाळी ११.०० ते ०३.००, सायंकाळी ७.३० ते ९.३० वाजे पर्यंत, संपर्क :– ९११२१०८१०८,

पत्ता : गुरुदेव स्पेशालिटी क्लिनिक व ऑर्थोकेअर, आयरीश हॉटेल समोर, माणिकनगर, अहिल्यानगर

# राम, कृष्णाचा विचार तर हरी उच्चारातच समाधानी जीवनाचे गमक आहे

## राजेंद्र टाक यांचे प्रतिपादन; आनंदाश्रमात रामकृष्णहरी कथा सोहळा उत्साहात



पारनेर तालुक्यातील आनंदाश्रम रायतळे येथे आयोजित त्रिदिन राम कृष्ण हरी या कार्यक्रमात बोलताना राजेंद्र टाक.

नगर – प्रभू श्री रामाचे आचरण, भगवान श्री कृष्णनिती आणि हरिस्मरण– नामसंकीर्तन यातच आनंदी आणि समाधानी जीवनाचे गमक असल्याचे प्रतिपादन कथाअभ्यासक तथा गायक – वक्ता राजेंद्र टाक यांनी केले. पारनेर तालुक्यातील आनंदाश्रम रायतळे येथे आयोजित त्रिदिन राम कृष्ण हरी या कार्यक्रमात ते बोलत होते. अधिकमासानिमित्ताने १७ ते १९ मे मी दरम्यान या संगीत कथा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

कथेच्या पहिल्या दिवशी बोलताना ते म्हणाले, श्रीरामकथेमधून आपल्याला जीवन जगण्याचे अनेक मौल्यवान बोध मिळतात, जे आजच्या काळातही तितकेच महत्वाचे आहेत. रामायण हे महाकाव्य नव्हे तर आदर्श जीवन जगण्याची दिशा आहे. तर दुसऱ्या दिवशी भगवान श्रीकृष्ण समजावून सांगताना ते म्हणाले बुद्धीमान, धर्माधारित व परिस्थितीनुरूप योग्य कृती करण्याची शिकवण भगवान श्रीकृष्णाने दिली. त्यांनी नेहमी धर्म, कर्तव्य, प्रेम, सत्य आणि व्यवहारज्ञान यांचा समतोल राखण्याचा संदेश दिला. तर कथा सांगता करताना ते म्हणाले मातापित्यांच्या ऋणाची जाण जो राखतो, सेवा आणि दयाभावाचा अंगीकार करून अहंकाराचा त्याग जो करतो, तोच वारकरी आणि त्यालाच पावतो हरी असेही श्री टाक यांनी सांगितले.

रायतळे आणि पंचक्रोशीतून आलेल्या साधुसंतांची, आध्यात्मिक क्षेत्रातील अनेकांची उपस्थिती या सोहळ्यास लाभली. अनेक भाविक भक्तांनी या दिव्य कथा श्रवण सोहळ्याचा लाभ घेतला. आश्रमाच्या वतीने ह. भ. प. राघवानंद महाराज यांनी देवस्थानच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली.

या प्रसंगी सुपा पोलिस ठाण्याच्या पी आय गडकरी मॅडम, भाजपा पारनेर तालुकाध्यक्ष राहुल शिंदे, पंचायत समितीचे माजी सभापती अशोक झरेकर उपस्थित होते. भाविकांनी रोज महाप्रसादाचा लाभ घेतला. आश्रमाच्या सर्व साधकांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता कष्ट घेतले. कथा सांगता प्रसंगी आभारप्रदर्शन उद्योजक बापूसाहेब डोके यांनी केले.



मानवता हाच एक धर्म प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अल्ताफ सय्यद यांना स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेच्या वतीने प्रतिष्ठेचा 'संत तुकडोजी महाराज समाजभूषण पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

# 'संत तुकडोजी महाराज समाजभूषण पुरस्कार'ने अल्ताफ सय्यद सन्मानित

नगर – मानवता हाच एक धर्म प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अल्ताफ सय्यद यांना स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेच्या वतीने प्रतिष्ठेचा 'संत तुकडोजी महाराज समाजभूषण पुरस्कार' प्रदान करण्यात आला. विविध सामाजिक, शैक्षणिक आणि मानवतावादी उपक्रमांच्या माध्यमातून समाजात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांचा हा सन्मान करण्यात आला.

निमगाव वाघा (ता. नगर) येथे छत्रपती संभाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित सहाव्या राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. अहमदनगर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. कृष्णा झावरे यांच्या हस्ते अल्ताफ सय्यद यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी साहित्यिक प्रतिभा खैरनार, युवा किर्तनकार ह.भ.प. दिपाली गणगे–कोकाटे, लावणी सम्राज्ञी रोहिणी थोरात, विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे, कवी चंद्रकांत पालवे, कवी संमेलनाचे अध्यक्ष चंद्रकांत चाबुकस्वार, माजी सरपंच साहेबराव बोडखे, डॉ. विजय जाधव, मुख्याध्यापक उत्तम कांडेकर, उद्योजक दिलावर शेख आदी उपस्थित होते.



## हज यात्रेस जाणाऱ्यांचा श्रीगोंदा तालुक्यातील मढेवडगांव ग्रामपंचायतीच्यावतीने ग्रामस्थांकडून सत्कार

मक्का शरीफ येथे हज यात्रेस जाणारे हाजी सलीम चेसीवाले, हाजी शरफुद्दीन जनाब, हाजी नासिर (सोनम मेन्स पार्लर), शाह नवाज़ कॉन्ट्रैक्टर (बुरहान नगर), रज़ा शाह नवाज़ यांचा श्रीगोंदा तालुक्यातील मढेवडगांव ग्रामपंचायतच्या वतीने सरपंच प्रमोद शिंदे, माजी उपसरपंच राजकुमार उंडे, चेअरमन बापूसाहेब वाबळे, आप्पासाहेब भोसले यांनी सत्कार केला. यावेळी कामरान इंजीनियर, जावेद हाजी, ज़मीर हाजी साहब, ज़ाहिर हाजी साहब, इब्राहिम जावेद, यूसुफ सलीम आदी उपस्थित होते.

# बॅडमिंटन संघ निवड चाचणी स्पर्धेचे १९ जूनपासून आयोजन

नगर – अहमदनगर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन आयोजित १७, १९ वर्षांच्या आतील आणि ओपन बॅडमिंटन मुलं व मुलींची जिल्हा संघ निवड चाचणी स्पर्धा आणि ११, १३, १५ वर्षांतील मुलं व मुली यांची जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा या १९ ते २१ जून रोजी होणार आहेत. या स्पर्धांमध्ये १७, १९ व ओपन या संघांची निवड करण्यात येणार आहे. ११, १३, १५ वर्षांतील मुलं व मुली यांच्या जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेमधून राज्यस्तरीय अंतर जिल्हा बॅडमिंटन स्पर्धांसाठी जिल्ह्याचा संघ निवडण्यात येणार आहे. निवड स्पर्धा ही एकेरी, दुहेरी या प्रकारांमध्ये होणार आहे.

या स्पर्धेत अधिकाधिक खेळाडूंनी सहभाग होण्याचे आवाहन अहमदनगर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. अशोक कोठारी व उपाध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी केले आहे.

सदर स्पर्धा महाराष्ट्र राज्य बॅडमिंटन असोसिएशनच्या नियमानुसार व अधिकृत पंचांच्या उपस्थितीत होणार आहेत. या स्पर्धेसाठी खेळाडूंना त्यांची नावनोंदणी ऑनलाईन पद्धतीने mbasso.in या वेबसाइट वर करायची आहे अशी माहिती असो. चे सचिव मिलिंद कुलकर्णी यांनी सांगितले आहे. नावनोंदणीसाठी काही अडचण येत असेल, तर त्या खेळाडूंनी मिलिंद कुलकर्णी ९४२३९६२६३२ व वरून भालेराव ८२६१९६९२८५ या नंबरवर संपर्क करावा.

नावनोंदणीची अंतिम तारीख १५ जून रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत असून त्यानंतर त्या खेळाडूंची नावे नोंदवली जाणार नाहीत. खेळाडूंची गटवार यादी mbasso.in या वेबसाइटवर १७ तारखेला दिसणार असून त्यामध्ये खेळाडूंनी आपल्या नावाची खात्री करावी याची सर्व खेळाडूंनी नोंद घ्यावी.

# ‘समाधान समारोह’अंतर्गत सर्वोच्च न्यायालयातील १५ वर्षे जुना वाद सामोपचाराने काढला निकाली

## विशेष लोकअदालतीत परस्पर संमतीने प्रकरणाचा निपटारा




नगर – न्याय प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग वाढवून ’न्याय आपल्या दारी’ ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्याच्या उद्देशाने सर्वोच्च न्यायालयाच्या वतीने समाधान समारोह हा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. २१, २२ व २३ ऑगस्ट रोजी आयोजित विशेष लोकअदालतीच्या माध्यमातून सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या तडजोडपात्र प्रकरणांचा परस्पर संमतीने निपटारा करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. जिल्ह्यातील ज्या पक्षकारांची तडजोडपात्र प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहेत, त्यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अथवा जिल्ह्यातील कोणत्याही तालुका न्यायालयाशी संपर्क साधून विशेष लोकअदालतीत सहभागी व्हावे, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजी कचरे तसेच सचिव योगेश पैठणकर यांनी केले आहे.

या विशेष मोहिमेअंतर्गत सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेले वांजोळी येथील सचिन पंढरीनाथ दळवी व इतर यांनी दाखल केलेले विरुद्ध कडूबाई भारतपुरी गोसावी यांच्यातील केस क्रमांक ५८७९/२०२३ हे प्रकरण तडजोडीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहिल्यानगर यांच्याकडे पाठविण्यात आले होते. दोन्ही पक्षकारांना नोटीस दिल्यानंतर ते प्रत्यक्ष उपस्थित राहिले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव योगेश पैठणकर यांनी दोन्ही पक्षकारांशी सविस्तर चर्चा करून समेट घडवून आणला. दोन्ही बाजूंनी तडजोडीस तयारी दर्शवल्याने तब्बल १५ वर्षांपासून सुरू असलेला वाद सामोपचाराने मिटविण्यात यश आले. या प्रक्रियेत ॲड. आघाव यांनीही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. दीर्घकाळ प्रकरण प्रलंबित राहिल्यामुळे संबंधित पक्षकारांना मानसिक तसेच आर्थिक त्रास सहन करावा लागत होता. मात्र, लोकअदालतीच्या माध्यमातून परस्पर सहमतीने वाद निकाली निघाल्याने दोन्ही पक्षकारांनी संतोष व्यक्त केला. अधिक माहितीसाठी ८५९१९०३६१६ या मोबाईल क्रमांकावर अथवा dlsanagar@gmail.com या ईमेलवर संपर्क साधावा.

# २०२६-२७ पासून बी. फार्मसी शिक्षण होणार अधिक आधुनिक आणि उद्योगाभिमुख

## विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी की नवे आव्हान?



भारतातील फार्मसी शिक्षणामध्ये मोठा बदल घडणार असून फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (PCI) ने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP 2020) नुसार बी.फार्म (B.Pharm) अभ्यासक्रमामध्ये व्यापक सुधारणा जाहीर केल्या आहेत. नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून देशभरातील सर्व मान्यताप्राप्त फार्मसी महाविद्यालयांमध्ये करण्यात येणार आहे.

या बदलामुळे फार्मसी शिक्षण केवळ औषधनिर्मितीपुरते मर्यादित न राहता आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), मशीन लर्निंग, डिजिटल हेल्थ, क्लिनिकल रिसर्च आणि इंडस्ट्री कौशल्यांशी जोडले जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील रोजगार आणि संशोधनाच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत.

**नवीन अभ्यासक्रमातील महत्त्वाचे बदल**

**१) AI आणि मशीन लर्निंगचा समावेश**

नवीन अभ्यासक्रमामध्ये Artificial Intelligence (AI), Machine Learning, Python Programming आणि Data Analytics यांसारख्या विषयांचा समावेश करण्यात आला आहे. हे विषय औषध शोध (Drug Discovery), फार्माकोव्हिजिलन्स, क्लिनिकल डेटा विश्लेषण आणि डिजिटल हेल्थमध्ये उपयुक्त ठरणार आहेत.

**२) उद्योग व रुग्णालय प्रशिक्षण अनिवार्य**

विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योग, रुग्णालय आणि क्लिनिकल रिसर्च संस्थांमध्ये प्रशिक्षण घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञान न राहता प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळणार आहे.

**३) संशोधन व कौशल्य विकासावर भर**

नवीन अभ्यासक्रमामध्ये संशोधन प्रकल्प, नवोपक्रम (Innovation), स्टार्टअप संस्कृती आणि उद्योजकता विकास यावर विशेष भर देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना संशोधन प्रकल्प पूर्ण करणे आवश्यक राहणार आहे.

**४) बहुपर्यायी करिअर संधी**

या अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांना खालील क्षेत्रांमध्ये करिअर करता येईल :

* Clinical Research
* Pharmacovigilance
* Regulatory ffairs
* AI **आधारित** Drug Discovery
* Hospital Pharmacy
* Digital Healthcare
* Pharmaceutical Industry
* Data nalytics in Pharma

**५) NEP २०२० आधारित लवचिक शिक्षण**

विद्यार्थ्यांना Elective Subjects निवडण्याची संधी मिळणार असून Skill-Based आणि Value-dded Courses चा समावेश करण्यात आला आहे.

**विद्यार्थ्यांनी काय तयारी करावी?**

नवीन अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांनी केवळ पाठांतरावर अवलंबून न राहता खालील कौशल्ये विकसित करणे आवश्यक ठरणार आहे :

* संगणक आणि डिजिटल कौशल्ये
* इंग्रजी व संवाद कौशल्य
* संशोधन पद्धती
* सादरीकरण कौशल्य
* डेटा विश्लेषण
* उद्योगाभिमुख प्रशिक्षण

विद्यार्थ्यांनी Python, AI Tools आणि Clinical Software यांचे प्राथमिक ज्ञान घेतल्यास भविष्यात मोठा फायदा होऊ शकतो. अनेक विद्यार्थ्यांमध्ये याबाबत उत्सुकता वाढताना दिसत आहे.

**पालक व विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बाब**

पूर्वी फार्मसी म्हणजे फक्त मेडिकल स्टोअर किंवा उत्पादन उद्योग अशी मर्यादित धारणा होती. मात्र आता फार्मसी क्षेत्र हेल्थकेअर टेक्नॉलॉजी, रिसर्च आणि डिजिटल मेडिसिनकडे झपाट्याने पुढे जात आहे. त्यामुळे बी.फार्मसी हा अभ्यासक्रम भविष्यात अधिक प्रभावी आणि रोजगारक्षम ठरणार आहे.

**निष्कर्ष** : PCI च्या नवीन बी.फार्म अभ्यासक्रमामुळे भारतातील फार्मसी शिक्षण आधुनिक, कौशल्याधारित आणि जागतिक दर्जाचे बनण्याची मोठी संधी निर्माण झाली आहे. योग्य मार्गदर्शन, प्रात्यक्षिक प्रशिक्षण आणि तंत्रज्ञानाची जोड मिळाल्यास भारतीय फार्मसी विद्यार्थी जागतिक स्तरावर स्पर्धा करू शकतील.

**लेखक : प्राचार्य डॉ. योगेश बाफना**
अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसी

# जुलैपासून १५ दिवसांत मोजणी, तर ७ दिवसांत देणार नकाशा

## सर्व नागरी क्षेत्रांत सिटी सर्वे करण्याचे भूमि अभिलेखचे नियोजन



महाराष्ट्र राज्याचे जमाबंदी आयुक्त शैलेश नवाल यांनी अहिल्यानगर येथील भूमी अभिलेख कार्यालयास भेट देऊन कामकाजाची पाहणी केली. यावेळी जिल्हा अधीक्षक संजय कुंभार, उपअधीक्षक भूमी अभिलेख अविनाश मिसाळ तसेच जितेंद्र भिंगारदिवे, रवी डीक्रूज उपस्थित होते. (छाया : समीर मन्यार)

नगर – राज्यातील सर्व नागरी क्षेत्रात सिटी सर्वे लागू करण्यासाठी आता विशेष नियोजन केले जाणार आहे. तसेच मोजणी प्रक्रिया अधिक गतिमान करण्यासाठी आगामी जुलै महिन्यापासून १५ दिवसांत मोजणी आणि पुढील ७ दिवसांत क प्रत म्हणजेच जमिनीचा नकाशा देण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येणार आहे, अशी घोषणा महाराष्ट्र राज्याचे जमाबंदी आयुक्त शैलेश नवाल यांनी केली.

अहिल्यानगर जिल्हा दौऱ्यादरम्यान भूमी अभिलेख विभागाच्या प्रलंबित मोजणी प्रकरणांचा आढावा घेतल्यानंतर ते बोलत होते. प्रलंबित मोजणी प्रकरणे वेळेत निकाली काढण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. जिल्ह्यातील वाढत्या मोजणी प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर आवश्यक मनुष्यबळ, यंत्रसामग्री आणि प्रशासकीय नियोजनाची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी आयुक्त शैलेश नवाल यांनी पारनेर व अहिल्यानगर येथील उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयांना भेटी दिल्या. पारनेर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर आलेली मोजणी प्रकरणे वेळेत निकाली काढण्यासाठी जिल्ह्यातून अतिरिक्त भूकरमापक उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच परवानाधारक भूकरमापकांची मदत घेऊन करण्यात आलेल्या प्रभावी नियोजनाबद्दल आयुक्तांनी समाधान व्यक्त केले.

पारनेरचे प्रभारी उपअधीक्षक भूमी अभिलेख जितेंद्र भिंगारदिवे यांनी राबविलेल्या विशेष नियोजनाची आयुक्तांनी प्रत्यक्ष पाहणी केली आणि पारनेर तालुक्यातील कामात चांगली प्रगती झाल्याचे निरीक्षण नोंदविले. या दौऱ्यात त्यांनी नागापूर परिसरातील सुरू असलेल्या मोजणी कामाचीही प्रत्यक्ष पाहणी केली.

आयुक्त नवाल यांनी अहिल्यानगर उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाला भेट देऊन मोजणी कर्मचाऱ्यांशी थेट संवाद साधला आणि त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. नागरिकांच्या समस्या अधिक तत्परतेने आणि जोमाने सोडविण्याचे आवाहन त्यांनी कर्मचाऱ्यांना केले.

जुलैपासून सुरू होणाऱ्या १५ दिवसांत मोजणी व पुढील ७ दिवसांत क प्रत या विशेष प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांच्या उपअधीक्षक भूमी अभिलेख अधिकाऱ्यांची एक महत्त्वाची बैठक घेऊन त्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली.

यावेळी जिल्हा अधीक्षक संजय कुंभार, उपअधीक्षक भूमी अभिलेख अविनाश मिसाळ तसेच भूमापन अधिकारी जितेंद्र भिंगारदिवे आणि भूमी अभिलेख कर्मचारी संघटनेचे नाशिक विभागीय अध्यक्ष रवी डीक्रूज यांनी विशेष परिश्रम घेतले. भूमी अभिलेख कर्मचारी संघटनेच्या नाशिक विभागाच्या वतीने विभागीय अध्यक्ष रवी डीक्रूज यांनी जमाबंदी आयुक्त शैलेश नवाल यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व संघटनेच्या कामकाजाची सविस्तर माहिती दिली.

# गावठी कट्टा बाळगुन दहशत करणाऱ्या तरुणाला पकडले

## केडगाव बायपासवर पोलिसांची कारवाई, कट्ट्यासह ३ काडतुसे जप्त

नगर – गावठी कट्टा जवळ बाळगुन दहशत करणाऱ्या तरुणाला कोतवाली पोलिसांनी पकडले आहे. केडगाव बायपास रोडवर २० मे रोजी रात्री ८.४८ वाजण्याच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. शहबाज निसार शेख (वय ३४, रा. रहेमतनगर, जोर्वेनाका संगमनेर, मुळ रा. एच डी एफ सी बँकेशेजारी, सोनई, ता. नेवासा) असे आरोपीचे नाव असून त्याच्या कडून गावठी कट्ट्यासह ३ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत.

कोतवालीचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांना सायंकाळी गोपनीय माहिती मिळाली की एक इसम हा गावठी कट्टा ताब्यात घेवुन संशयित रित्या केडगाव बायपास रोडवर अनुराज टायर्स समोरील बाजुस आला आहे. ही माहिती मिळताच पो.नि. गायकवाड यांनी तात्काळ पोलीस पथक कारवाई साठी पाठविले. या पथकाने त्या ठिकाणी जावून संशयित आरोपी शहबाज शेख यास पकडले. त्याची अंगझडती घेतली असता त्याचेकडे एक गावठी बनावटीचे ८० हजार रुपये किंमतीचे अग्नीशस्त्र व ३ हजार रुपये किंमतीचे ३ जिवंत काडतुस असा मुददेमाल मिळुन आला आहे. त्यास ताब्यात घेवुन त्याचे विरुध्द पो.कॉ. सुरज कदम यांच्या फिर्यादी वरून कोतवाली पोलीस स्टेशन येथे भारतीय हत्यार कायदा कलम ३ चे उल्लंघन २५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि. कुणाल सपकाळे, उपनिरीक्षक प्रविण पाटील, पोलिस अंमलदार राहूल शिंदे, दळवी, बोरगे, दौड, साबीर शेख, विजय ठोंबरे, सुरज कदम, दिपक रोहोकले, सत्यजित शिंदे, रमेश शिंदे, दत्तात्रय कोतकर, सचिन लोळगे, अमोल गाडे, अतुल लाटे, अतुल काजळे, शिरीष तरटे, गंगाधर आंग्रे, किरण बडे, म.पो.कॉ.पल्लवी रोहकले तसेच दक्षिण मोबाईल सेलचे पो.कॉ. राहुल गुंडु यांचे पथकाने केली आहे.



अहिल्यानगर शाखेतर्फे कंपनी कायदा विषयावर एकदिवसीय सेमिनार उत्साहात आयोजित करण्यात आले होते.

# अहिल्यानगर शाखेतर्फे आयोजित कंपनी कायद्यावरील सेमिनार उत्साहात

नगर – अहिल्यानगर शाखेतर्फे कंपनी कायदा विषयावर एकदिवसीय सेमिनार उत्साहात आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी शाखाध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया यांनी प्रास्ताविक करत शाखेच्या विविध शैक्षणिक उपक्रमांचा आढावा घेतला. बदलत्या कायदे व लेखापरीक्षण क्षेत्रात अद्ययावत ज्ञानाचे महत्त्व अधोरेखित करत सदस्यांनी अशा उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले.

सेमिनारमध्ये विविध तज्ज्ञ वक्त्यांनी महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन केले. सीए चंद्रप्रकाश खेमका यांनी IGAAP अंतर्गत उच्च दर्जाचे वित्तीय विवरण या विषयावर सखोल विवेचन केले.

सीए चंदन लाहोटी यांनी प्रायव्हेट लिमिटेड कंपन्यांच्या ऑडिटमधील विविध पैलू या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले.

तसेच सीए मुकेश बजाज यांनी आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी IGAAP ऑडिटमधील नवीन बदल व महत्त्वाच्या बाबी यावर सविस्तर माहिती दिली. कंपनी सेक्रेटरी गौरव नाशिककर यांनी कंपनी कायदा २०१३ अंतर्गत अनुपालनातील गुंतागुंत तसेच CFSS योजना २०२६ या विषयावर मार्गदर्शन करत उपस्थितांच्या शंकांचे निरसन केले. या सेमिनारला सीए सभासदांचा प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सीए सुनंदा रच्चा यांनी केले.

आभार प्रदर्शन उपाध्यक्ष सीए महेश तिवारी यांनी केले. यावेळी कार्यकारिणी सदस्य सीए काजल चंदे, माजी अध्यक्ष सीए प्रसाद पुराणिक तसेच शाखेचे सर्व माजी अध्यक्ष उपस्थित होते.

# बँकांच्या कर्जाऐवजी बीओटी धोरण राबवा

## महानगरपालिकेच्या व्यापारी संकुल नियोजनावर जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांचा इशारा



महापालिकेला निवेदन देते प्रसंगी योगेश साठे, अमर निरभवने, प्रसाद भिवसने, सुधीर ठोंबे, राजीव भिंगारदिवे, सुरेश पानपाटील, देविदास भालेराव आदी.

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेने शहरातील पाच महत्त्वाच्या ठिकाणी व्यापारी संकुले उभारण्यासाठी बँकांकडून ७५% कर्ज घेण्याचे नियोजन केले आहे. शहराच्या विकासासाठी व्यापारी संकुले आवश्यक आहेतच, परंतु त्यासाठी केवळ कर्जाचा मार्ग अवलंबणे हे भविष्यात महापालिकेच्या आर्थिक स्वायत्ततेसाठी घातक ठरू शकते, असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांनी दिला आहे. महापालिकेने कंत्राटदार आणि बँकांच्या हितासाठी शहराला कर्जबाजारी करण्याचा घाट घातल्यास वंचित बहुजन आघाडी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल, असे त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

या संदर्भात प्रशासनाला दिलेल्या निवेदनात वंचित बहुजन आघाडीने अनेक आधुनिक आणि पर्यायी आर्थिक पर्याय सुचवले आहेत,

बँकांचे कर्ज काढून व्याजाचा बोजा वाढवण्यापेक्षा, हे प्रकल्प बांधा-वापरा-हस्तांतरित करा (बीओटी) तत्त्वावर राबवावेत. यामुळे पालिकेचा भांडवली खर्च शून्य होईल. गाळेधारकांकडून केवळ एकरकमी डिपॉझिट न घेता, त्यांच्या व्यवसायातील उलाढालीवर आधारित अत्यल्प रेव्हेन्यू शेअरिंग मॉडेल राबवावे, ज्यामुळे पालिकेला कायमस्वरूपी वाढते उत्पन्न मिळेल. प्रत्येक संकुलाच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्प आणि सांडपाणी पुनर्वापर यंत्रणा अनिवार्य करावी, ज्यामुळे सामायिक वीज खर्च शून्य होईल व पालिकेच्या संसाधनांवरील ताण कमी होईल. नेहरू मार्केट आणि गंजबाजार या गर्दीच्या ठिकाणी ऑटोमेटेड मल्टि-लेव्हल पार्किंग उभारून, त्यातून मिळणारे पार्किंग शुल्क आणि डिजिटल डएऊ जाहिरात फलकांच्या उत्पन्नातून कर्जाचे हप्ते सहज फेडता येतील. परिसराची गरज ओळखून प्रोफ ` सर कॉलनी येथे आयटी व एज्युकेशन हब आणि सर्जपुरा येथे सांस्कृतिक व हस्तकला केंद्र विकसित करावे. तसेच व्यापाऱ्यांसाठी महानगरपालिकेने अधिकृत ई-कॉमर्स पोर्टल सुरू करावे. बँकांकडून कर्ज घेण्याची घाई करण्यापूर्वी प्रशासनाने वरील आधुनिक पर्यायांचा विचार करून सुधारित प्रकल्प अहवाल जनतेसमोर मांडावा. तसेच, या संकुलांमध्ये अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीयांसाठी नियमानुसार आरक्षण राखून सामाजिक न्याय पाळावा, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीने केली आहे. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे शहर महासचिव अमर निरभवने, जिल्हा महासचिव प्रसाद भिवसने, जिल्हा संघटक सुधीर ठोंबे, भिंगार शहराध्यक्ष राजीव भिंगारदिवे, सुरेश पानापाटील, देविदास भालेराव आदी उपस्थित होते.

# संशयास्पद ‘विशारद’ प्रमाणपत्रांवरून प्राथमिक शिक्षकांवर कारवाई करा

## पदोन्नती प्रक्रियेत बनावट कागदपत्रांचा वापर? शिक्षण विभागातील अनियमिता

नगर – जिल्हा परिषद अहिल्यानगरच्या शिक्षण विभागात संशयास्पद पदवी प्रमाणपत्रांच्या आधारे पदोन्नती मिळविण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या वतीने करण्यात आला आहे. प्रयाग अलाहाबाद संस्थेकडून हिंदी विषयात देण्यात आलेल्या विशारद पदवीच्या प्रमाणपत्रांचा वापर करून काही शिक्षकांनी पदोन्नती व बदलीचे लाभ मिळविण्याचा प्रयत्न केल्याची बाब समोर आल्याने संबंधितांची चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी आरपीआयचे युवक कार्याध्यक्ष अजय बडोदे यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की शिक्षण विभागामध्ये विविध अनियमितता व अनागोंदी कारभार सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही शिक्षकांकडून संशयास्पद अथवा खोट्या पदवी प्रमाणपत्रांच्या आधारे शासकीय लाभ मिळविण्याचा प्रयत्न केला जात असल्याने शिक्षण व्यवस्थेची विश्वासार्हता धोक्यात येत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

निवेदनानुसार, ऑक्टोबर २०२३ मध्ये पार पडलेल्या केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रियेदरम्यान जवळपास ८ ते १० मुख्याध्यापकांनी प्रयाग अलाहाबाद संस्थेचे डी.एड. समकक्ष अथवा बी.एड. संबंधित प्रमाणपत्रे जोडून पदोन्नतीचा लाभ घेण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, याबाबत शंका उपस्थित झाल्यानंतर संबंधित प्रमाणपत्रधारक शिक्षकांनी तात्काळ माघार घेतल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या प्रमाणपत्रांच्या वैधतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

तसेच, प्रयाग अलाहाबाद संस्थेने सन २००५नंतर हिंदी विषयातील विशारद पदवी देण्यास स्थगिती दिल्याची माहिती समोर येत असल्याने त्यानंतर मिळालेल्या प्रमाणपत्रांच्या वैधतेवर गंभीर संशय व्यक्त केला जात आहे. या संपूर्ण प्रकरणामागे मोठे रॅकेट कार्यरत असण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.

आरपीआय (आठवले) च्या वतीने संबंधित सर्व प्राथमिक शिक्षकांची सखोल चौकशी करून त्यांनी सादर केलेली प्रमाणपत्रे वैध आहेत का ? याची पडताळणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच खोटे अथवा संशयास्पद प्रमाणपत्रांचा वापर करून पदोन्नती मिळविण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोषींवर तातडीने कायदेशीर कारवाई करून गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.



वाहतूक सुरक्षितता व सुशोभीकरणाअंतर्गत अहिल्यानगर महापालिकेतर्फे माळीवाड्यातील जुना स्टॅन्ड परिसरातील रस्त्यांवरील रोड मार्किंग स्ट्रिप्स रंगवण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. (छाया – संजय जोशी)

# क्षयरोग (टीबी): समज, प्रतिबंध आणि सकारात्मक दृष्टिकोन

क्षयरोग (टीबी) हा एक संसर्गजन्य आजार आहे जो प्रामुख्याने फुफ्फुसांवर परिणाम करतो. हा Mycobacterium tuberculosis नावाच्या जीवाणूमुळे होतो. योग्य वेळी निदान आणि पूर्ण उपचार घेतल्यास हा आजार पूर्णपणे बरा होऊ शकतो.

**क्षयरोगाचा प्रतिबंध** (Prevention)

* लवकर निदान आणि उपचार : लक्षणे दिसताच तपासणी करणे
* पूर्ण औषधोपचार : डॉक्टरांनी दिलेली औषधे नियमित आणि पूर्ण कालावधीसाठी घेणे
* खोकताना तोंड झाकणे
* स्वच्छता आणि वायुवीजन : घरात हवा खेळती ठेवणे
* पोषणयुक्त आहार : रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी
* BCG bg : बालपणात दिली जाणारी लस संरक्षण देते

* **उपचार**

टीबीसाठी मोफत आणि प्रभावी उपचार उपलब्ध आहेत. औषधे साधारणतः ६ महिने किंवा त्याहून अधिक काळ घ्यावी लागतात. उपचार अधुरे सोडल्यास आजार परत वाढू शकतो किंवा औषधांना प्रतिकारक (Drug-resistant TB) बनू शकतो.

१ सकारात्मक दृष्टिकोन का महत्त्वाचा आहे?

टीबी हा बरा होणारा आजार आहे – हे लक्षात ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

सकारात्मक विचार कसे मदत करतात?

* उपचार पूर्ण करण्यासाठी प्रेरणा मिळते
* मानसिक तणाव कमी होतो
* शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते
* लवकर बरे होण्यास मदत होते

**सकारात्मक संदेश**

* टीबी बरा होऊ शकतो – मी नक्की बरा होणार!
* मी माझी औषधे नियमित घेणार आणि निरोगी होणार
* हा आजार तात्पुरता आहे, माझं आरोग्य कायमचं आहे

**समाजाची भूमिका**

* टीबी रुग्णांबद्दल भेदभाव न करता त्यांना आधार देणे
* जागरूकता वाढवणे
* योग्य माहिती पसरवणे

**निष्कर्ष** :क्षयरोग हा गंभीर असला तरी पूर्णपणे बरा होऊ शकणारा आजार आहे. योग्य उपचार, चांगला आहार आणि सकारात्मक दृष्टिकोन यामुळे रुग्ण लवकर बरा होऊ शकतो. भीती नाही – माहिती आणि उपचार हाच उपाय!

**– डॉ. स्नेहा तिरपुडे**
MD DNB Pulmonary Medicine
Consultant Pulmonologist,
Anandrushiji Hospital
every first and third Thursday

